cmyk

संपादकीय

केंद्राची मनमानी शिक्षण क्षेत्राच्या मुळावर !

केंद्र सरकारने राज्य सरकारच्या अधिकारांवर आणखी एक नवीन बालंट आणले आहे. या वेळेचा विषय विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या नियुक्तीचा आहे. आजवर संपूर्ण देशात जी जी विद्यापीठे कार्यरत आहेत त्या विद्यापीठांचे कुलगुरू नियुक्तीचे अधिकार ती विद्यापीठ ज्या राज्यात आहेत त्या राज्यातील विधिमंडळाला आणि तेथील सरकारांना आहेत, पण आता केंद्र सरकारने राज्य सरकारांचे हे अधिकार हिरावून घ्यायचे योजले आहे. त्यासाठी त्यांनी एक नवीन विधेयक आणले असून ते विधेयक जनतेपुढे हरकतीसाठी मांडले गेले आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२६९ | सोमवार, दि.२० जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

शेतकरी आंदोलनाची कोंडी फुटणार !

अखेर केंद्र सरकारकडून चर्चेचा प्रस्ताव, १४ फेब्रुवारीला चंदिगढमध्ये बैठक

नवी दिल्ली । वृतसंस्था

तब्बल ११ महिन्यांपासून पंजाब–हरियाणा सीमेवर आंदोलन करत असलेल्या पंजाबमधील शेतकऱ्यांशी अखेर केंद्र सरकारने संपर्क साधला. सरकारने आंदोलक शेतकऱ्यांपुढे चर्चेचा प्रस्ताव ठेवला आहे. त्यासाठीची बैठक १४ फेब्रुवारीला चंदिगढमध्ये होईल. सरकारने चर्चेची तयारी दर्शवल्याने शेतकरी आंदोलनाबाबत निर्माण झालेली कोंडी फुटण्याची चिन्हे आहेत.

पंजाबमधील शेतकरी विविध मागण्यांसाठी सीमेवरील शंभू आणि खनौरी या ठिकाणी मागील वर्षीच्या १३ फेब्रुवारीपासून तळ ठोकून आहेत. शेतमालाला किमान आधारभूत किमतीची (एमएसपी) कायदेशीर हमी मिळावी ही त्यांची प्रमुख मागणी आहे. खनौरी भागात शेतकरी नेते जगजितसिंग डल्लेवाल ५५ दिवसांपासून बेमुदत उपोषण करत आहेत. उपोषणामुळे ७० वर्षीय डल्लेवाल यांची प्रकृती खालावली. मात्र, त्यांनी उपोषणावर ठाम राहत वैद्यकीय उपचार घेण्यास नकार दर्शवला. अखेर त्यांच्या खालावलेल्या प्रकृतीची दखल घेऊन केंद्र सरकारने अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाला आंदोलक शेतकऱ्यांच्या भेटीसाठी पाठवले. संबंधित शिष्टमंडळाने सरकारचा चर्चेचा प्रस्ताव आंदोलकांसमोर मांडला. त्या शिष्टमंडळाने डल्लेवाल यांचीही भेट घेतली. शिष्टमंडळाने आणि इतर शेतकरी नेत्यांनी प्रस्तावित चर्चेत सहभागी होण्यासाठी डल्लेवाल यांना वैद्यकीय उपचार घेण्याचे आवाहन केले. त्यावर डल्लेवाल यांनी सहमती दर्शवली. ◀◀ पान २ वर

घोडका राजुरीची दुर्दैवी घटना अत्यंत दुःखदायक-आ.संदीप क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील घोडका राजुरी येथील पोलीस भरतीचा सराव करणार्या तीन तरूणांना एस.टी. बसने चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. ही दुर्दैवी घटना अत्यंत दुःखदायक असल्याची भावना आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे. तसेच सदरील तरूण हे सर्वसामान्य घरातील आणि गरीब परिस्थितील असल्याने शासनाकडून त्यांच्या कुटुंबीयांना मदत व्हावी अशी मागणीही घोडका राजुरी ग्रामस्थ, मृत तरुणांचे नातेवाईक व मतदारसंघाच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली होती. त्यानुसार मंत्री महोदयांनी प्रत्येकी १० लक्ष रूपये इतकी मदत कुटुंबियांना जाहीर केली आहे.

घोडका राजुरी येथील पोलीस भरतीची तयारी करणारे ५ तरूण नेहमी प्रमाणे रविवारी (दि.५) रोजी सकाळी सराव करत असताना अचानक एस.टी. महामंडळाची बीड येथून परभणीकडे निघालेल्या बसने व्यायाम करत असणार्या या तरुणांना चिरडले त्यापैकी २ तरूणांनी बचावात उडी मारल्याने ते जखमी झाले परंतु त्यातील ३ तरूण सुबोध बाबासाहेब मोरे (वय २०), विराट बब्रूवान घोडके (वय १९), ओम सुग्रीव घोडके (वय २०) हे जागीच ठार झाले. ◀◀ पान २ वर

एसटीच्या धडकेत पोलिस भरतीची तयारी करणारे तीन युवक ठार

- बीड तालुक्यातील घोडका राजुरी गावाजवळ घडली घटना
- जिल्हा रुग्णालय परिसरात एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना घेराव
- परिवहन मंत्र्यांकडून प्रत्येकी १० लाखांच्या मदतीची घोषणा

बीड । प्रतिनिधी

बीड–परळी महामार्गावर बीड–परभणी एसटी बसने पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तीन युवकांना धडक दिली. यात तिघांचा जागीच मृत्यू झाला. बीडजवळ घोडका राजुरी येथे (दि.१९) पहाटे ६.३० वाजता ही घटना घडली. अपघातात ठार झालेले तिघेही तरूण घोडका राजुरी येथील आहेत. उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात आणले असता ग्रामस्थांनी एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना घेराव घातला. दरम्यान, आमदार संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा रुग्णालय परिसरात पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणली. तसेच ग्रामस्थांचा राज्य परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी संवाद घडवून दिला. यावेळी सरनाईक यांनी प्रत्येक १० लाख रूपयांची मदत देण्याची घोषणा केली.

१९ जानेवारी २०२५ रोजी पहाटे ६.३० वाजता बीड तालुक्यातील घोडका राजुरी गावाजवळील स्वराज्य हॉटेलच्या पुढे बीडकडून परभणीकडे निघालेल्या एस.टी. बसने (क्रमांक एमएच १४ बीटी १४७३) रोडवर व्यायाम करणाऱ्या ३ युवकांना जोरदार धडक दिली. यात तीन युवकांपैकी दोन युवक जाग्यावरच मयत झाले तर एक्या युवकाचा उपचारा दरम्यान जिल्हा रुग्णालय बीड येथे मृत्यू झाला. बस चालकाचे नाव पुंडलिक देविदास मुसळे असे असून, त्यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ◀◀ पान २ वर

जमावाकडून बस पेटवण्याचा प्रयत्न

बीड तालुक्यातील घोडका राजुरी येथून जाणाऱ्या बीड ते परळी राज्य महामार्गावर पहाटे पोलीस भरतीसाठी व्यायाम करणाऱ्या युवकांना बसने धडक दिली, यात तिघांचा जागीत मृत्यू झाला. घटनेची माहिती गावामध्ये वाऱ्यासारखी पसरताच ग्रामस्थांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. अपघात पाहून संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी राप बस पेटवण्याचा प्रयत्न केला. यात बसचे तीन शीट जळाले.

दुपारी एक वाजता झाला अंत्यविधी

बस अपघातामध्ये ठार झालेल्या तीन युवकांचा उत्तरीय तपासणीनंतर दुपारी एक वाजता घोडका राजुरी गावांमध्ये शोकाकूल वातावरणात अंत्यविधी करण्यात आला. यावेळी संपूर्ण ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच अंत्यविधी देखील शांततेमध्ये व्हावा अनुचित प्रकार घडू नये म्हणून ग्रामीण पोलीस स्टेशन व पिंपळनेर पोलीस स्टेशन येथील पोलीस हजर होते.

तीन किलोमीटर अंतरावर घोडका राजुरी गाव

बीड – परळी राज्य महामार्ग हा बीड तालुक्यातील घोडका राजुरी गावापासून जातो. या गावातील अनेक युवक हे पोलीस भरतीच्या तयारीसाठी म्हणून या महामार्गावर रनिंग आणि व्यायाम करण्यासाठी पहाटे येत असतात. रविवारी पहाटे साडेसहाच्या सुमारास हा अपघात घडला. या अपघाताची माहिती गावामध्ये अर्ध्या तासात समजली. साडेसात ते आठ च्या सुमारास घोडका राजुरी येथील ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले.

पालकमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल अजित पवार यांचा डॉ.योगेश क्षीरसागरांकडून सत्कार

बीड । पतिनिधी

शिर्डी येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी निवड झाली. त्याबद्दल पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सत्कार केला.

बीड विधानसभा मतदारसंघातील जनतेच्यावतीने अजितदादा पवार यांचे अभिनंदन केले. त्यांचा प्रशासनातील दांडगा अनुभव व कणखरपणा ◀◀ पान २ वर

महाकुंभमेळ्यात भीषण आग, अनेक तंबू जळून खाक

प्रयागराज / वृत्तसंस्थत्त

उत्तर प्रदेशातील प्रयागराजमधील महाकुंभमेळ्यात अनेक तंबूंना आग लागली. त्यामुळे काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. या दुर्घटनेत सुमारे २५ तंबू जळून खाक झाल्याचे समोर आले आहे. अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. स्थानिक अधिकाऱ्यांनी, पोलिस आणि अग्निशमन दलांसह आग विझवण्याचे प्रयत्न करण्यात आले. ◀◀ पान २ वर

तर राज्य बंद करू; मनोज जरांगे पाटलांचा जनआक्रोश मोर्चातून इशारा

संभाजीनगर। प्रतिनिधी

मुख्यमंत्र्यांनी शब्द दिल्याने लोक शांत आहेत. यातील एकही जण सुटला तर मुख्यमंत्र्यांचा सामना आमच्याशी असल्याचा इशारा जरांगे पाटील यांना दिला. खंडणी आणि खून करणाऱ्यांना सांभाळले कुणी? हे चार्जशीटमध्ये आलेच पाहिजे. ज्या दिवशी आरोपी सुटतील असे आम्हाला वाटेल त्या दिवशी राज्य बंद करू, असा इशारा जरांगे पाटील यांनी जन आक्रोश मोर्चातून दिला.

बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यामध्ये जन आक्रोश मोर्चे सुरूच आहेत. रविवारी (१९ जानवोरी) छत्रपती संभाजी नगरमध्ये संतोष देशमुख आणि परभणीचे सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय देण्यासाठी जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चातून मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला कडक इशारा दिला. धनंजय मुंडे यांच्यावर सुद्धा घणाघाती प्रहार केला. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांच्या ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू: ३.५० क्विंटल			
	३,५००	३,५४०	३,५२०
ज्वारी/हायब्रिड: ५३.०० क्विंटल			
	१,८००	२,९३०	२,४९४
मका/लोकल: ०.५० क्विंटल			
	२,१५०	२,१५०	२,१५०
तूर : १३५.५० क्विंटल			
	६,४६०	७,२५१	७,०२४
उडीद : ०.५० क्विंटल			
	६,०००	६,०००	६,०००
बाजरी: १.५० क्विंटल			
	३,५००	३,५००	३,५००
मुग : ०.५० क्विंटल			
	६,१०१	६,१०१	६,१०१
सोयाबीन: ९५.५० क्विंटल			
	४,०००	४,११६	४,०७४
हरभरा: १.५० क्विंटल			
	५,८०१	६,०००	५,९००

मी अभिमन्यु नाही, मी अर्जुन आहे!

मला ठरवून टार्गेट केले जात आहे; मंत्री धंनजय मुंडे रोखठोक बोलले

शिर्डी । प्रतिनिधी

मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यापासून अजितदादांच्या प्रत्येक निर्णयात ठामपणे सोबत उभा राहिलो. पक्षाच्या वाईट काळात वेगवेगळी आंदोलने, यात्रा आदींच्या माध्यमातून अख्खा महाराष्ट्र पिंजून काढला. मात्र आता बीड जिल्ह्यातील एका दुर्दैवी हत्या प्रकरणा आडून मला जाणीवपूर्वक ठरवून टार्गेट केले जात आहे. महायुतीतील नेत्यांकडूनच मला लक्ष्य केले जात आहे, याचेच जास्त वाईट वाटत आहे. पक्षातील काही लोक देखील दादांच्या कानाला लागून चुकीची माहिती देऊन दिशाभूल करत आहेत. मात्र तरीही माझी भूमिका व वस्तुस्थितीची जाणीव असल्याने या कठीण काळातही पक्ष म्हणून दादा माझ्या पाठीशी उभे आहेत. आज कुणी निराधार व बिनबुडाचे कितीही आरोप करून मला अडकवण्याचा, माझा अभिमन्यु करण्याचा प्रयत्न केला तरीही उपयोग होणार नाही, कारण मी अभिमन्यु नाही, मी अर्जुन आहे! अजित दादांनी आता बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारले आहे, याचा आनंदच असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे.

शिर्डी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित नव संकल्प शिबिराच्या व्यासपीठावरून ते बोलत होते. बीड जिल्ह्यात डिसेंबर महिन्यात झालेली स्व.संतोष देशमुख यांची हत्या ही अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक होती. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फासावरच लटकवले पाहिजे, हे माझे पहिल्या दिवसापासून स्पष्ट मत आहे. गुन्हेगारी ही एक नीच वृत्ती आहे, त्याला जात धर्म नसतो. मात्र या घटनेच्या आडून जात म्हणून एका समाजाला जाणीवपूर्वक गुन्हेगार ठरवले जात आहे. सातत्याने आमची मीडिया ट्रायल केली जात आहे, याबद्दल धनंजय मुंडे यांनी खंत व्यक्त केली . तुमच्या अंगावर कोणी आले ◀◀ पान २ वर

मी काम करणारा कार्यकर्ता

मी सतत काम करणारा एक कार्यकर्ता आहे, नेता फक्त नावाला आहे. माझ्यातला कार्यकर्ता कधीच मरणार नाही. मी एक निष्ठावान कार्यकर्ता आहे, पक्ष नेतृत्वाने पाँडिचेरी मध्ये जाऊन पक्ष विस्ताराचे काम कर म्हंटले तर तिथे जाऊन मी काम करेल. पक्षाला सुद्धा कार्यकर्ताभिमुख व्हावे लागेल. कार्यकर्त्याला ताकत देताना संपूर्ण विश्वास देखील ठेवणे आवश्यक आहे, तेव्हाच पक्ष संघटना मजबूत होईल. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये पक्षाचा कार्यकर्ता कुठेही कमी पडणार नाही, असा विश्वास धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला.

बीड जिल्ह्यात सामाजिक सलोखा राखला जावा

स्व.संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकारनानंतर झालेल्या मीडिया ट्रायल, सोशल मीडियावरील चिखलफेक, साधलेले राजकारण अशा अनेक गोष्टींनी जिल्ह्याचे सामाजिक ऐक्य धोक्यात आले आहे. आपला पक्ष शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारा पक्ष आहे, त्यामुळे आता आमच्या बीड जिल्ह्यातील सामाजिक सलोखा जपण्याची जबाबदारी सुद्धा सर्वांना घ्यावी लागेल. ऊसतोड करून, कष्ट करून, कोरडवाहू शेती करून जगणारे आम्ही सामान्य लोक आहोत. आमचा जिल्हा बिहार आणि आमची परळी तालिबान नाही. अशीच बदनामी सुरू राहिली तर पुढच्या महिन्यात महाशिवरात्री आहे, बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथ यांच्या दर्शनाला भाविक येतील का, अशी भीती वाटत असल्याचे सांगून परळीची बदनामी थांबवा असे कळकळीचे आवाहन त्यांनी केले.

cmyk

अग्रलेख

केंद्राची मनमानी शिक्षण क्षेत्राच्या मुळावर !

केंद्र सरकारने राज्य सरकारच्या अधिकारांवर आणखी एक नवीन बालंट आणले आहे. या वेळेचा विषय विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या नियुक्तीचा आहे. आजवर संपूर्ण देशात जी जी विद्यापीठे कार्यरत आहेत त्या विद्यापीठांचे कुलगुरू नियुक्तीचे अधिकार ती विद्यापीठ ज्या राज्यात आहेत त्या राज्यातील विधिमंडळाला आणि तेथील सरकारांना आहेत, पण आता केंद्र सरकारने राज्य सरकारांचे हे अधिकार हिरावून घ्यायचे योजले आहे. त्यासाठी त्यांनी एक नवीन विधेयक आणले असून ते विधेयक जनतेपुढे हरकतीसाठी मांडले गेले आहे. त्यावर येत्या तीस दिवसांत हरकती नोंदवण्याची मुदत देण्यात आली आहे. मुळात ही माहिती प्रसारमाध्यमांपर्यंतच अद्याप पोचलेली नाही. किंवा त्यांच्यामार्फत ती विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्याची व्यवस्थाच झालेली नाही.

यूजीसी कायद्यात बदल करणारा हा प्रस्ताव आहे. त्यात विद्यापीठांचे कुलगुरू नेमण्याचे सर्व अधिकार यूजीसीला देण्यात आले आहेत. राज्य सरकारचा तो अधिकार संपुष्टात आणण्याचा प्रस्ताव आहे. यूजीसी म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोग. या आयोगामार्फत आत्तापर्यंत विद्यापीठांना आवश्यक असलेला निधी पुरवला जात होता. परंतु आता याच आयोगाला विद्यापीठांचे कुलगुरू नियुक्तीचे अधिकार दिले जाणार आहेत. या मसुद्यातील अनेक बाबी धक्कादायक आहेत. त्यातला सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे विद्यापीठाचा कुलगुरू हा शिक्षण क्षेत्रातीलच असला पाहिजे असा नियम काढून टाकण्याचा प्रस्ताव आहे. आता कुलगुरू कोणत्याही क्षेत्रातला असू शकतो असे यात नमूद करण्यात आले आहे. आत्तापर्यंत विद्यापीठाचा कुलगुरू हा शिक्षण क्षेत्राशी संबंधित असावा अशी किमान अपेक्षा होती आणि त्यानुसार किमान निकष ठरवले गेले होते. हे निकष आता केंद्र सरकार बदलू पाहत आहे. आता उद्योग क्षेत्रातील एखादा माणूसही एखाद्या विद्यापीठाचा कुलगुरू बनू शकतो. आजपर्यंत विधिमंडळाला आणि विधिमंडळामार्फत सरकारला आपल्या राज्यातील कुलगुरू नियुक्तीचे अधिकार होते आणि या अधिकाराला राज्यपालांमार्फत अंतिम मान्यता दिली जात होती. पण आता हे सगळे अधिकार केंद्र सरकार आपल्या हातात घेणार आहे. त्यातून अनेक प्रकारची संकटे भविष्यात उभी राहू शकतात आणि शिक्षण क्षेत्राचा पायाच डळमळीत होऊ शकतो ही बाब प्रामुख्याने लक्षात घेणे गरजेचे आहे.

एवढेच नव्हे तर विद्यापीठात नेमले जाणाऱ्या साहाय्यक प्राध्यापकांना नेट परीक्षा उत्तीर्ण होण्याची सक्ती काढून टाकण्यात आली आहे. विद्यापीठातील प्राध्यापक किमान पात्रतेचा असावा यासाठी त्याने किमान नेटची परीक्षा उत्तीर्ण होणे ही अट घालण्यात आली होती आणि ती अतिशय रास्त होती. कारण हा प्राध्यापक देशातील नवीन तरुण पिढी शिक्षित करण्याचे काम करतो. त्यामुळे त्याच्यात किमान पात्रता असावी या उद्देशातून नेट परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट घातली गेली होती. ती अटच कढून टाकल्यानंतर भविष्यकाळात विद्यापीठांमार्फत नेमले जाणारे प्राध्यापक नेमक्या काय पात्रतेचे असतील याचा अंदाज लागत नाही. मुळात केंद्र सरकार मनमानी पद्धतीने कुलगुरूची नियुक्ती करणार असेल तर त्या विद्यापीठाचा एकूणच कारभार किती दोलयमान अवस्थेत जाईल आणि त्यातून शिक्षण क्षेत्राचे किती नुकसान होईल याचाही आपण अंदाज बांधू शकत नाही. पश्चिम बंगालमध्ये तेथील तृणमूल काँग्रेस सरकारच्या कुलगुरू नियुक्तीला आडकाठी करण्यासाठी राज्यपालांमार्फत बरेच प्रयत्न झाले. तरीही राज्यपाल नियुक्तीचे अंतिम अधिकार राज्य सरकारचे असल्यामुळे आता ही व्यवस्थाच बदलून सर्वाधिकार आपल्या ताब्यात घेण्याचा केंद्र सरकारचा हा घातक प्रयत्न आहे. वास्तविक राज्याचे शैक्षणिक धोरण त्या राज्याची भाषा, संस्कृती आणि तेथील एकूणच लोकजीवन या आधारे ठरवण्याची मुभा घटनेने त्या त्या राज्यांना दिलेली असताना त्यावर केंद्र सरकारने अतिक्रमण करण्याचे कारण नाही.

कुलगुरूंच्या नियुक्तीसाठी जी एक समिती प्रस्तावित करण्यात आली आहे त्यात दोन प्रतिनिधी केंद्र सरकारचे असतील आणि एक प्रतिनिधी त्या विद्यापीठाच्या प्रशासनाचा असेल, म्हणजेच अंतिम निर्णय हा केंद्र सरकारच्याच हातात असणार आहे. हे प्रस्तावित बदल ज्या राज्यांना मान्य होणार नाहीत त्या राज्यांना यूजीसीमार्फत निधी दिला जाणार नाही अशी तंबीही या प्रस्तावित मसुद्यात देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रस्तावित विधेयकाला विरोध सुरू झाला आहे.

गेल्या ६ जानेवारीला या प्रस्तावाचा मसुदा केंद्र सरकारने जाहीर केला आणि त्यानंतर तीनच दिवसांत केरळ, पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि कर्नाटक या चार राज्यांनी या मसुद्याला कडाडून विरोध नोंदवला आहे. मुळात केवळ ३० दिवसांत हरकती नोंदवा असे केंद्राने जे सांगितले आहे ती मुदत अत्यंत अपुरी आहे. या प्रस्तावाविषयी शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांना, विद्यार्थी संघटनांना, प्राध्यापक संघटनांना पुरेसा अवधी देणे आवश्यक होते. पण ते काही न करता हा विषय दडपून नेण्याचा केंद्र सरकारचा मनसुबा यातून स्पष्ट होतो आहे. हा मसुदा केंद्र सरकारने जाहीर केला असला, तरी त्याला प्रसारमाधमांतून प्रसिद्धीच मिळालेली नाही. त्यामुळे तो विद्यार्थी, पालक किंवा शिक्षण संस्थांपर्यंत अद्याप पोहोचलेलाच नाही. त्यामुळे केंद्र सरकारने ही तीस दिवसाची मुदत तातडीने वाढवून द्यावी आणि या प्रस्तावाबाबत सर्व दूर प्रसिद्धी करावी त्यातून जी चर्चा पुढे येईल त्यानुसार पुढील निर्णय सरकारने घ्यावा हे सोयीचे ठरेल. अन्यथा ही घाई आणि मनमानी देशाच्या एकूणच शिक्षण क्षेत्राच्या मुळावर उठू शकते याची दखल केंद्राने घेतलेली बरी.

सरसंघचालकांविरोधात युवक काँग्रेसचे आंदोलन

संघ मुख्यालयाकडे जाताना आंदोलकांना पोलिसांनी अडवले

नागपूर । प्रतिनिधी

अयोध्येत २२ जानेवारी २०२४ रोजी श्री रामाची प्राणप्रतिष्ठा झाली तेव्हा देश खऱ्या अर्थाने मुक्त झाला या सरसंघचालक डॉ. मोहन भागवतांच्या वक्तव्याविरोधात नागपुरात युवक काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेत आंदोलन पुकारले आहे. युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदयभानू चीब यांच्या नेतृत्वात नागपूरातील देवडिया काँग्रेस भवनमधून निघून युवक काँग्रेसचे कार्यकर्ते संघ मुख्यालयाच्या दिशेने निघाले. मात्र विनापरवानगी करण्यात येणाऱ्या या आंदोलनाला आणि युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना संघ मुख्यालयाच्या दिशेने जाण्यापासून पोलिसांनी मध्येच रोखले.

संघाने आधी ध्वजाचा अवमान केला. आता स्वातंत्र्याचा अपमान करत आहे, अशा आशयाचे बॅनर्स घेऊन कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. यावेळी संघावर बंदी घाला, अशी मागणीही युवक काँग्रेसचे कार्यकर्त्यांनी केली. यावेळी गोंधळ होण्याची शक्यता लक्षात घेत पोलिसांनी या कार्यकर्त्यांना थांबवण्यासाठी चिटणीस पार्क चौकावर आधीपासूनच जोरदार बंदोबस्त लावला होता. युवक काँग्रेसचे कार्यकर्ते संघ मुख्यालयाच्या दिशेने निघाले असताना पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र कार्यकर्ते जास्त संख्येने असल्याने पुढे जात होते. अशातच कार्यकर्ते ऐकत नसल्याचे बघून पोलिसांनी बळाचा वापर करून कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष कुणाल राऊत हेही उपस्थित होते. तर यावेळी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदयभानू चीब यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण बघायला मिळाले. मात्र पोलिसांनी परिस्थितिवर नियंत्रण मिळवत परिसरात शांतता प्रस्थापित करण्यात यश मिळविले.

सैफ अली खानवरील हल्लेखोराला ५ दिवसांची पोलीस कोठडी

मुंबई । प्रतिनिधी

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर राहत्या घरात घुसून त्याच्यावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना घडली होती. चोरीच्या उद्देशाने घरात घुसलेल्या चोराकडून हा हल्ला करण्यात आला होता. या घटनेतील आरोपीला मुंबई पोलिसांनी रविवारी (१९ जानेवारी) सकाळी अटक केली. त्यानंतर हल्ला करणाऱ्या मोहम्मद शहजाद या आरोपीला वांद्रे कोर्टात हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपीला ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलिसांनी न्यायालयाकडे १४ दिवसांची कोठडी मागितली होती. मात्र, न्यायालयाकडून आरोपीला ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. मुंबई पोलिसांनी न्यायालयाला आरोपीने सैफ अली खान हल्ला केला असल्याची माहिती दिली. तसेच, हल्ल्यात वापरलेल्या ब्लेड जप्त करण्यात आले आहे. आरोपीच्या नागरिकत्वाबाबतही चौकशी करायचे असल्याचे पोलिसांनी न्यायालयात सांगितले. रविवारी सकाळी ठाण्यातील कासारवडवली येथील हिरानंदानी इस्टेटच्या मागील परिसरातून मुंबई पोलिसांनी आरोपीला अटक केली. या आरोपीने नाव मोहम्मद शरिफूल इस्लाम शहजाद (३० वर्षे) आणि विजय दास अशी सांगितली. आरोपी ठाण्यातील एका बारमध्ये हाऊसकीपिंग वर्कर म्हणून काम करत होता. पोलिसांनी प्रेस नोटमध्ये आरोपी हा मुळचा बांगलादेशमधील झलोकाठी जिल्ह्यातील ग्राम राजाबरीया येथील नागरिक असल्याची माहिती दिली आहे. तसेच, त्याने चोरीच्या उद्देशाने गुन्हा केल्याची कबुली देखील दिली आहे.

वाद झाल्यानंतर हॉलतिकिटांवरून काढून टाकला जातीचा उल्लेख

मुंबई । प्रतिनिधी

दहावी, बारावीच्या परीक्षा काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. राज्य शिक्षण मंडळाच्या या परीक्षा करियरच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या मानल्या जातात. काही दिवसांपूर्वीच या परीक्षेच्या हॉलतिकीटांचे वाटप करण्यात आले होते. या हॉलतिकिटांवर विद्यार्थ्यांच्या नावासह त्यांच्या जातीचा सुद्धा उल्लेख केला होता. यावरून राज्य शिक्षण मंडळावर अनेकांनी टीका करण्यात आली होती. त्यानंतर अखेर शिक्षण मंडळाने हा निर्णय रद्द केला आहे.

महाविद्यालयात राज्य शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या १२ वीच्या परीक्षांच्या प्रवेशपत्रिकांचे वितरण सुरू झाले. त्यावर जातीचा उल्लेख केला गेला होता. त्यातच काही विद्यार्थ्यांच्या जातीची नोंद चुकीची असल्याचेही निदर्शनात आले. शाळेत प्रवेश घेताना जातीची चुकीची नोंद झाली असेल आणि पुढील प्रवेशासाठी विशिष्ट प्रवर्गातून प्रवेश घ्यायचा असेल तर जातीची योग्य नोंदणी आवश्यक असते. शाळेतील जातीची नोंद कळावी त्यामध्ये सुधारणा असल्यास शाळा सोडल्याचा दाखला घेताना त्यावर सुधारित जात यावी अशा उद्देशाने मंडळाने जातीचा उल्लेख केला होता. मात्र आता लोकभावनेचा आदर करत, तो मागे घेत असल्याचे स्पष्टीकरण राज्य शिक्षण मंडळाने दिले आहे. येत्या २३ तारखेपासून बारावीच्या विद्यार्थ्यांना नवीन हॉलतिकिटे ॲडमिट कार्डच्या लिंकद्वारे डाऊनलोड करता येईल. आणि १० वीच्या विद्यार्थ्यांना २० जानेवारीपासून हॉलतिकीट देण्यात येतील.

पान १ वरून...

शेतकरी आंदोलनाची

मात्र, एमएसपीची मागणी मान्य होईपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डल्लेवाल यांनी सरलेल्या वर्षातील २६ नोव्हेंबरपासून उपोषण सुरू केले. तेव्हापासून त्यांनी काहीच खाल्लेले नाही. केवळ पाण्यावर ते तग धरून आहेत. डल्लेवाल यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी मागील काही दिवसांपासून १२१ शेतकऱ्यांनीही बेमुदत उपोषण सुरू केले. त्या शेतकऱ्यांनी रविवारी डल्लेवाल यांनी वैद्यकीय उपचार घेतल्यानंतर उपोषण समाप्त केले.

एसटीच्या धडकेत पोलिस भरतीची

मृतांमध्ये सुबोध (बालू) बाबासाहेब मोरे (वय २०), विराट बब्रूवान घोडके (१९) आणि ओम सुग्रीव घोडके (२०) यांचा समावेश आहे. घटनेची माहिती कळताच या तरुणांच्या नातेवाईकांनी तात्काळ जिल्हा रुग्णालयात धाव घेतली. तर तिकडे गावातील संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी बस पेटवून दिली. घटनास्थळी पोलीसांनी वेळीच पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणली. दरम्यान, राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक अनूजा दुसाने, यंत्र अभियंता धारणी कांडगिरे, विभागिय वाहतुक अधिकारी राजकुमार दिवटे, वाह.निरीक्षक बी.व्ही. बनसोडे यांनी भेट दिली. तसेच बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंडेवार, सहा. पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे, पिंपळनेर पोलीस ठाण्याचे सहा.पोलीस निरीक्षक घुगे यांच्यासह इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणली. तसेच जिल्हा रुग्णालय परिसरात देखील अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस दलाकडून बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दरम्यान पोलिसांनी अपघातग्रस्त बस ताब्यात घेऊन पोलीस मुख्यालय येथे रवाना केली आहे.

घोडका राजुरीची दुर्दैवी घटना अत्यंत

पोलीस होण्याचे स्वप्न उराशी बाळगून मेहनत करणारे हे युवक अत्यंत सर्वसामान्य घरातील आणि गरीब परिस्थितील होते. त्यामुळे घोडा राजुरी येथील ग्रामस्थ, मृत तरुणांचे नातेवाईक यांनी मृतांच्या कुटुंबाला आर्थिक मदत व कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी केली होती. त्यानुसार आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना या घटनेची माहिती देऊन या अपघातातील मृत झालेल्या तरूणांच्या कुटुंबियांना मदतीची मागणी केली होती. त्यानुसार परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मृत्यू झालेल्या तीन्ही तरूणांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १० लक्ष रूपयांची मदत जाहीर केली आहे. दरम्यान बीड विधानसभा मतदारसंघाचा आमदार म्हणून मी या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी तर आहेच परंतु या कुटुंबियांच्या घरातील सदस्य म्हणून मी यापुढे त्यांच्या सुखःदुखात कायम असेल. तसेच शासनाने जाहीर केलेली मदत कुटुंबियांना मिळेपर्यंत पाठपुरावा करणार आहे यासोबतच ग्रामस्थ व नातेवाईक यांच्या मागणीनुसार कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीत सामावून घेण्याबातही शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले आहे.

तर राज्य बंद करू; मनोज जरांगे

कुटुंबाशी पाठीशी भरणार असल्याचे जरांगे पाटील म्हणाले. परभणीमधील सोमनाथ सूर्यवंशी कुटुंबीयांच्या सुद्धा पाठीशी उभे राहणार असल्याचेही जरांगे पाटील यांनी सांगितले. देशमुख हत्या प्रकरणात फार मोठं नेटवर्क असून खंडणी, खून, पैसा पुरवणारे, त्यांना लपवणारे, डाके टाकणारे, बलात्कार, छेडछाड करणाऱ्या यांच्या टीम असल्याचे ते म्हणाले. ज्यांनी खून करायला पाठवले, सामूहिक कट रचणारा सगळ्यात मोठा गुन्हेगार असल्याचेही ते म्हणाले. जरांगे पाटील म्हणाले की, समोरचा डाव टाकतो ते ओळखायला शिका. देशमुख कुटुंबावर आलेली वेळ ही राज्यात कोणावरही येऊ नये. हे पुढील काळात होऊ द्यायचे नसेल, तर धनंजय मुंडेंच्या टोळ्या संपवा असे ते म्हणाले. धनंजय मुंडेंची त्यांच्या लोकांना मूक संमती असल्याचा आरोपही त्यांनी केला. एकदा मराठा बिथरला तर तुझी टोळी चटणीला देखील उरणार नाही, असा इशारा सुद्धा जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांना दिला.

महाकुंभमेळ्यात भीषण

रविवारी दुपारी एका तंबूला आग लागली. काही क्षणात परिसरात अनेक तंबूंना आगीने वेढले. आग विझवण्यासाठी अग्निशमन अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) ची एक टीम देखील घटनास्थळी दाखल झाली. महाकुंभमेळ्यासाठी उभारण्यात आलेल्या एका कापडी तंबूत सिलिंडरचा स्फोट झाला. यामुळे आग लागली. काही क्षणात आगीने अनेक तंबूंना आपल्या कवेत घेतले, अशी माहिती उत्तर प्रदेशचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रमोद शर्मा यांनी दिली. दरम्यान, सर्व लोक सुरक्षित आहेत. कोणीही जखमी झालेले नाही. या प्रकरणाची चौकशी केली जाईल, अशी माहिती अतिरिक्त पोलीस महानिरीक्षण भानू भास्कर यांनी दिली.

पालकमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल अजित

बीड जिल्ह्याला प्रगतीपथावर घेवून जाण्यास नक्की मदत करेल, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

मी अभिमन्यु नाही

तर त्याला आम्ही शिंगावर घेतले पक्षात आल्यापासून आजवरच्या वाटचालीत आमचे नेते म्हणून आम्ही तुमच्या पाठीशी उभे राहिलो. अनेक प्रसंगी अजितदादांना खलनायक ठरवण्याचा प्रयत्न झाला. तुमच्या अंगावर कोणी आले तर त्याला आम्ही शिंगावर घेतले. २०१४ - १९ या काळात विरोधी पक्षनेतेपदी काम केले. पक्षाच्या पडत्या काळात चार वेळा हल्लाबोल, परिवर्तन, शिवस्वराज्य यात्रांमध्ये सहभागी होऊन सबंध महाराष्ट्र पिंजून काढला. तत्कालीन सरकारला वाकवायचे काम केले. २०१९ साली पहाटेची शपथ घेऊ नका हे मी सांगितले होते. ती शपथ त्यांनी घेतली पण शिक्षा मात्र मला मिळाली, अशी खंतही धनंजय मुंडे यांनी आज प्रथमच बोलून दाखवली. सामाजिक न्याय मंत्री म्हणून मी चांगले काम करून दाखवले. गाव - वस्त्यांची जाती वाचक नावे बदलणे, ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ यांसारखे अनेक क्रांतिकारी निर्णय त्याकाळात घेतले. ११ हजार कोटी रुपये पीकविमा एका वर्षात मिळवून देणारा कृषिमंत्री मी, मात्र त्यावरूनही टीका झाली. मात्र अर्धवट माहिती देऊन बदनामी करणारे लोक यावर बोलत नाहीत, असेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले. लोकसभा निवडणुकीमध्ये अनेक ठिकाणी युतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी मी गेलो होतो. त्यावेळी बारामती लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा वहिनींच्या प्रचारासाठी जाऊ नकोस अन्यथा पुढे विधानसभेत त्याचा तुला त्रास होईल, असा सल्ला मला अनेकांनी दिला होता. मात्र तरीही मी गेलो. माझ्यासह अनेकांना विधानसभा निवडणुकीत ठरवून टार्गेट केले गेले. मी माझ्या परळीच्या जनतेच्या आशीर्वादाने एक लाख चाळीस हजार मतांच्या लिडने निवडून आलो, त्याचीच पोटदुखी अनेकांना प्रकर्षाने झाली. ठाण्यात मी पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचाराला गेलो म्हणून तिथले नेते बीडमध्ये येऊन मला टार्गेट करत आहे, हेही उघड झाले. विधानसभा निवडणुकीत मी केवळ ५ दिवस पूर्णवेळ परळीत होतो, उर्वरित वेळेत मी पक्षाच्या अनेक उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेतल्या, बैठका घेतल्या. त्यातील बहुतांश उमेदवार निवडून आले, असेही मुंडे पुढे बोलताना म्हणाले.

पान ६ वरून...

अत्याचाराला वाच्या फोडण्यासाठी

महिला सुरक्षेची सुरुवात घरापासून करावी. महिला सुरक्षेचा विषय आपण दररोज पेपरातून वाचतो.केवळ सामाजिक माध्यमातून महिला सुरक्षेच्या चर्चा न होता. महिला सक्षमीकरण: महिला सक्षमीकरण त्याची सुरुवात घरापासून करावी. हे सांगत असताना त्यांनी त्यांच्या आईचे उदाहरण दिले ते म्हणाले की आई आठवी पास होती परंतु लग्न झाल्यानंतर वडिलांनी आईचे पुढील शिक्षण करत उच्चशिक्षित केले. आई शिक्षिका आहे. माझी पत्नी अधिकारी आहे. साक्षरतीकरणाला सुरुवात आम्ही आमच्या घरापासून केली आहे. दरम्यान पोस्को कायदा विशद करत पोलीस प्रशासनाने महिला मुलींच्या सुरक्षेच्या विविध उपक्रम सांगत दामिनी पथक बाबत माहिती सांगितली. शिक्षणात महिलांची संख्या दिसते परंतु नोकरीत दिसत नाही शिक्षण झाले की लग्न लावून देणे योग्य नाही तिला शिकू द्या असे म्हणत त्यांनी मोबाईलचा उपयोग जनरल नॉलेज साठी किती महत्त्वाचे आहे मोबाईल आजच्या युगात महत्त्वाचे साधन आहे ज्ञान माहितीसाठी याचा उपयोग केला पाहिजे. प्रगती करायची असेल तर.वाद जातीवाद भेदाभेद संपवा. वाद जातीवाद भेदाभेद संपवावा लागेल तर आपण प्रगती करू शकाल असेही म्हणाले शेवटी बोलताना सगळ्यांना आवाहन करत सगळ्यांनी साथ द्या बीड जिल्ह्याचे चित्र बदलून टाकू असा विश्वास व्यक्त केला. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार व्यकटराव कदम प्राचार्य के. के. पाटील डॉ. सदाशिव देशपांडे डॉ. आनंद नावंदर सह पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे संस्थेच्या संचालक शैलाताई आरबाड संचालक सौ लताताई कदम, शिरसाळा ग्रामपंचायतच्या वतीने ग्रामपंचायत सदस्य सविता देशमुख, व फिनिक्स ग्रुपच्या सदस्य डॉ. रश्मी नावंदर डॉ.उषा पवार डॉ.स्वाती सोनवणे डॉ. प्रणिता तौर डॉ. सुषमा ललवाणी सौ. वंदना जोशी प्रा. अनिता दहिवाळ याची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. रश्मी नावंदर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. उषा पवार यांनी दिला. आभार प्रा.डॉ.अरुणा वाळके यांनी मांनले. यावेळी प्रा. फिरोज काझी लिखित सन्माननीय षंढांनो या एकांकिकेचे सादरीकरण करण्यात आले. या एकांकिकेचे दिग्दर्शन प्रा. डॉ.तुकाराम देवकर यांनी केले. त्यांना सहाय्य डॉ. रुखमिनिकांत पांडव सर यांनी केले. या नाटकात मुख्य भूमिकेत प्रतीक्षा जाधव, सुप्रिया जाधव ,वैष्णवी जाधव, मुक्ता रासवे ,भावना किरवले आणि रमा लाडे होते.या कार्यक्रमासाठी सूत्रसंचालन प्रा.डॉ.अनंत जाधव व वंदना जोशी यांनी केले कार्यक्रमाचे नियोजन गृहविज्ञान विभाग प्रमुख प्रा.डॉ. उषा माने यांनी केले यावेळी सिरसाळा व परिसरातील ५०० महिलांना वाण म्हणून मेनबत्तीचे वाटप करण्यात आले. मुली,मुले व पालक मिळून कार्यक्रमाच्या शेवटी ६५० आकड्याची नोद झाली.

पुनमचंदजी लखेरा

व्यवसायासह नम्रता, एकमेकांशी नाते जोडणारा त्यांचा हळवा स्वभाव अनेकांना भावत असे. अशा या व्यक्तिमत्त्वाला अंबाजोगाईकर मुकल्याचे दुःख अनेकांनी व्यक्त केले. त्यांच्या निधनाबद्दल शहरातील व्यापारी, माहेश्वरी परिवार यांच्यासह सर्व उपस्थितांनी त्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

बीड जिल्हा तबलीग जमातचे प्रमुख सय्यद नजीब

बीड शहरातील राजुरी बेस येथील मरकज मस्जीद येथून त्यांचा जनाजा काढण्यात आला. राजुरी वेस, बशीर गंज चौक, जुने एसपी ऑफिस समोरील रोड, खासबाग रोड मार्गे जनाजा इजतेमा मैदान येथे दाखल झाला. यावेळी जिल्हाभरातून आलेल्या मुस्लिम समाज बांधवांनी जनाचा नमाज अदा केली. बीड शहरातील मर्कज मस्जिद समोरील कारंजा भागातील रहिवासी असलेले सय्यद नजीब सय्यद मासूम सहाब (अमीर साहाब) हे गेल्या काही वर्षांपासून आजारी होते. त्यांच्यावर बीड शहरातील काकू नराना हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. शनिवारी रात्री त्यांची प्राणजोत मालवली. मृत्यूसमयी ते ८५ वर्षाच्या होते, त्याच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. सय्यद अमिर सहाय यांच्या कुटुंचियांच्या दुःखात सिटीझन परिवार सहभागी आहे.

मौलाना जफर मलीक सहाब नवे अमीर

बीड जिल्ह्याच्या तबलीग जमातचे अमीर (प्रमुख) सय्यद नजीब मौलाना सहाय यांच्या निधनानंतर बीडचे नवे अमीर म्हणून मौलाना जफर मलीक सहाब यांची नियुक्ती झाली आहे. राज्य तबलीग जमातच्या निर्णयानंतर मौलाना जफर मलीक सहाब यांची नियुक्ती करण्यात आली.

उमेद प्रदर्शनाच्या तिसऱ्या

कर्मचारी व स्टॉलधारक महिलांनी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून आपल्या विविध कलागुणांचे सादरीकरण केले . मुख्यमंत्री शंभर दिवस कार्यक्रमाच्या माध्यमातून आज सकाळी सात ते सकाळी नऊ वाजेपर्यंत माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आदित्य जीवने, माननीय प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील, माननीय अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री वासुदेव सोळंके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री मुंडे, श्री प्रदीप काकडे, मोकाटे, श्री सुरेश केंद्रे इ. सह जिल्हा परिषदेतील सर्व विभाग प्रमुख उमेद सर्व स्टाफ इत्यादींनी जिल्हा परिषद कार्यालय परिसरात श्रमदान करून स्वच्छता मोहीम राबवली या कार्यक्रमाचे नियोजन जिल्हा अभियान व्यवस्थापक श्री मुरहारी सावंत व जिल्हा व्यवस्थापक श्री शकील शेख यांनी केले. सदरील सरस प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी उमेद अभियानातील कर्मचाऱ्यांच्या विविध समित्या तयार केल्या असून या समित्यांच्या माध्यमातून जिल्हा अभियान व्यवस्थापक श्री मुरहरी सावंत,जिल्हा व्यवस्थापक शकील शेख ,आशा पवार, जीवन धापसे, भारत पवार, अश्विनी खेडकर, तालुका अभियान व्यवस्थापक तालुका व्यवस्थापक, सपोर्ट स्टाफ इत्यादीं परिश्रम घेत आहेत. उमेद प्रदर्शनातील सर्व स्टॉलवर डिजिटल पेमेंटची सुविधा दिलेली असून यामुळे ग्राहकांची सुविधा झाली असून भेट देणाऱ्या ग्राहकांनी व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याबद्दल स्टॉल धारक महिलांचे भरभरून कौतुक केले आहे तसेच खाद्यपदार्थ स्टॉल वरील महिला व्यावसायिक ऍप्रॉन ,कॅप, ग्लोज परिधान करून अत्यंत स्वच्छ पद्धतीने खाद्यपदार्थ देत असून एकूणच प्रदर्शन परिसरात स्वच्छता ठेवण्यात आलेली आहे.

प्रगतीच्या 'नवस' एकांकिकेस सर्वोत्कृष्ट

ठाणे येथे आयोजित करण्यात आलेल्या ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या व्यासपीठावरून या संमेलनाचे अध्यक्ष गंगाराम गव्हाणकर यांनी केलेल्या भाषणात नाट्य स्त्रोत सृष्टीतल्या यशाचे श्रेय त्यांनी बोलीभाषेतल्या त्यांच्या ''वस्त्रहरण'' या विक्रमी नाटकाला दिले होते. त्याचवेळी बोलीभाषा तील नाटके किंवा एकांकिका रंगभूमीवर सादर व्हायला पाहिजेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली होती. त्यांच्या या अपेक्षेला ज्येष्ठ नाट्यनिर्माते गोविंद चव्हाण यांनी प्रतिसाद देत बोलीभाषा एकांकिका स्पर्धेच्या माध्यमातून नवीन व्यासपीठाच निर्माण केले. त्याआधी अनेक वर्षापासून गोविंद चव्हाण यांनी त्यांच्या ''सुप्रिया प्रोडक्शन'' या नाट्यसंस्थेद्वारे बरेच नाट्यकृती रंगभूमीवर आल्या होत्या बोलीभाषा एकांकिका स्पर्धेच्या पहिल्या वर्षी त्यांना महाराष्ट्रातून मोठा प्रतिसाद मिळाला आणि बोलीभाष याचा हा उत्सव सूक्ष्म मार्गावर पावले टाकत असल्याची पावती त्यांना मिळाली मात्र कोरोना काळात गोविंद चव्हाण यांचे निधन झाले आणि हा प्रयोग थांबतो की काय, अशी शंका उपस्थित झाली पण त्यांची कन्या सुप्रिया चव्हाण हिने ''शो मस्ट गो ऑन'' वृत्त अंगीकारत बोलीभाषा प्रयोगांचा वसा अखंड पुढे सुरू ठेवला त्यावेळी व्हिजन व्हाईस अँड ॲक्ट उपक्रमाचे सर्वेसर्वा व रंगकर्मी श्रीनिवास नार्वेकर तिच्या पाठीशी उभे भक्कम उभे राहिले. यावर्षी प्राथमिक फेरीत सादर झालेल्या एकांकिकातून सात एकांकिकाची अंतिम फेरी मुंबईच्या माटुंगा येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात रंगली यात जुन्नरी, वराडी, मराठवाडी ,पुणेरी ,कोल्हापुरी, घाटी, लमान बंजारा, अशा विविध बोलीभाषातून सादर झालेल्या नाट्यकृतींची प्रतिबिंब पडले आणि एकूणच हा प्रयोग सत्कारणी लागला या निमित्ताने महाराष्ट्रातल्या अनेक बोलीभाषा रंगभूमीवर अवतरतात त्याची जोपासना होते आणि रसिकांनाही या बोलीभाषांची ओळख होते हे या संपूर्ण प्रयोगाचे फलित म्हणायला हवे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच

शुभेच्छा देऊन उपस्थितांचे मन जिंकले. या स्वागत समारंभाला भारतीय राजदूत मृदुलकुमार आणि उत्तर प्रदेशचे मुख्य सचिव मनोज कुमार सिंह उपस्थित होते. सकाळी ६ वाजता झालेल्या या कार्यक्रमासाठी विविध भागांतून मराठी बांधव आवर्जून उपस्थित राहिले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उत्स्फूर्त स्वागताबद्दल आनंद व्यक्त करत म्हटले की, ''या स्वागताने मला घरच्याप्रमाणे वाटले

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि.२० जानेवारी २०२५

नितीन तरकसे यांना शिक्षणमहर्षी आदर्श शिक्षक पुरस्कार

पाटोदा । प्रतिनिधी

प्रति वर्षी समाजातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मैत्रा फाऊंडेशन महाराष्ट्र च्या वतीने राज्यस्तरीय पुरस्कार देवून गौरविण्यात येते.२०२४-२५ या वर्षीचे पुरस्कार नुकतेच जाहीर झाले.या वर्षीच्या पुरस्कारासाठी पाटोदा तालुक्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द मुलींची शासकीय निवासी शाळा पाटोदा या शाळेचे शिक्षक व प्रभारी मुख्याध्यापक नितीन शकुंतला शेषेराव तरकसे यांना जाहीर झाला. शिष्यवृत्ती,कला,क्रीडा सामाजिक कार्य यात सतत कार्यरत असणारे तरकसे यांनी निवासी शाळेच्या विद्यार्थिनींना शालेय क्रीडा स्पर्धामध्ये कबड्डी,खो - खो या सांघिक खेळात तसेच वैयक्तिक खेळात राज्यस्तरावर घेवुन गेले. या वर्षी ग्वालियर मध्यप्रदेश या ठिकाणी झालेल्या राष्ट्रीय लोकनृत्य स्पर्धेत मुलींना समानतेची संधी या विषयावरील स्पर्धेत तालुका स्तर ते राष्ट्रीय स्तरावर लोकनृत्य पोहचवले.या कार्याची दखल घेत मैत्रा फाऊडेशन महाराष्ट्र या संस्थेने तरकसे सर यांना शिक्षण महर्षी आदर्श शिक्षक पुरस्कार देवून सन्मानित केले.पुरस्काराचे वितरण दिनांक १९.०१.२०२५ रोजी बीड शहरातील सामाजिक न्याय भवन येथे मान्यवरांच्या हस्ते झाले.

पवनऊर्जा संदर्भातील तक्रारी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे दाखल कराव्यात-ॲड.देशमुख

बीड। प्रतिनिधी

पवनऊर्जा प्रकल्पासंदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्याच बरोबर त्यातील खंडणीखोर देखील वाढले आहेत. शेतकऱ्यांनी पवनऊर्जा संच उभारताना जर कोणता नियम भंग होत असेल, तर त्याची तक्रार जिल्हाधकाऱ्यांकडे असलेल्या समितीकडे कराव्यात, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.राज्यातील पवन ऊर्जा प्रकल्पांसाठी संपदित झालेल्या जमीन खरेदी व्यवहारातील गैरप्रकार त्याचप्रमाणे संपादित जमिनीपेक्षा जादा अतिक्रमण करणे, अशा प्रकारामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. यातून मार्ग काढण्यासाठी शासनाने पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात जिल्हास्तरावर आणि उपविभाग स्तरावर समित्या स्थापन केलेल्या आहेत.

या समित्यांना पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासने, पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यवहारिक व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे, पवन ऊर्जा प्रकल्पंबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे आणि जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पांच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या अडचणीचे निराकरण करणे, त्याचप्रमाणे जमीन मालक, शेतकरी, स्थानिक ग्रामस्थ आणि प्रकल्प विकसक यांच्यामध्ये समन्वय ठेवणे, प्रकल्प उभारणीसाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावरचे सर्व प्रकारचे सहाय्य करणे, इत्यादी अधिकार दिलेले आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत. तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि पोलीस अधीक्षक हे सदस्य आहेत. त्याचप्रमाणे महाऊर्जा कडील अधिकारी या समितीच्या सदस्य सचिव आहे. यामध्ये सदस्य म्हणून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, अधीक्षक अभियंता महावितरण, अधीक्षक भूमी अभिलेख, जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, सह जिल्हा निबंधक वर्ग एक, संबंधित उप वनसंरक्षक, संबंधित पवन ऊर्जा प्रकल्पाची विकसक / प्रकल्प धारक यांचे प्राधिकृत प्रतिनिधी, प्रकल्पग्रस्त संबंधित शेतकऱ्यांचे दोन प्रतिनिधी इत्यादी सदस्य आहेत. तर निवासी उपजिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांनी नामनिर्देशित केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जाच्या कोणताही एक अधिकारी निमंत्रक व समन्वयक म्हणून काम पाहतो.

उपविभाग स्तरावर असलेल्या समन्वय समितीमध्ये उपविभागीय अधिकारी अध्यक्ष, मुख्यालय तहसीलदार समन्वय तथा सदस्य सचिव, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम, उप अभियंता जिल्हा परिषद, उपकार्यकारी अभियंता, महावितरण, तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, तालुका कृषी अधिकारी, संबंधित सहाय्यक वन संरक्षक, संबंधित पवन ऊर्जा विकसक अथवा प्रकल्प धारक यांचे प्रतिनिधी, पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि संबंधित गावच्या सरपंच किंवा प्रतिनिधी यांचा या समितीत समावेश आहे. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागाने ही समिती दिनांक २१ ऑक्टोबर २०१३ रोजी स्थापन केलेली आहे. मात्र याला वेळोवेळी प्रसिद्धी न दिल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत गेल्या आहेत. त्याचबरोबर संबंधित प्रकल्प विकसक हे देखील यात अनभिज्ञ असल्याने खंडणीखोरा संदर्भात ते तक्रारी करत नाहीत. एकूणच सर्व स्तरावरून संगणमत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत चाललेल्या आहेत. त्यामुळे पवन ऊर्जा संदर्भात जर तक्रारी असतील तर शेतकऱ्यांनी त्या जिल्हास्तरावर अथवा उपविभाग स्तरावर दाखल करून तक्रारींचा योग्य निपटारा करून घ्यावा, असे आवाहन ॲड. देशमुख यांनी केले आहे.

शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास करावा-जोशी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष हिवाळी शिबिर मोजे बांगरवाडी येथे संपन्न होत आहे या शिबिराच्या दुसऱ्या बौद्धिक क्षेत्रात प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामीण विकासात युवकांचे योगदान या विषयावर बौद्धिक क्षेत्राचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राध्यापक बाळासाहेब जोशी प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक साळुंखे सर कार्यक्रम अधिकारी डॉक्टर शिवाजीराव काकडे प्राध्यापक लोखंडे बी बी गावातील ज्येष्ठ नागरिक उत्तमराव काळे उपस्थित होते सर्वप्रथम या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉक्टर लोखंडे यांनी केले पाहुण्यांचा परिचय करून देऊन ग्रामीण विकास या विषयावर आज साळुंखे सर व जोशी सर आपल्याला मार्गदर्शन करणार आहेत आपल्या देशात ७५ वर्षी झाले तरी ग्रामीण भागाचा विकास झालेला नाही त्यामुळे या विषयाची ओळख युवकांना व्हावी या हेतूने हा विषय ठेवण्यात आला कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राध्यापक साळुंखे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शेतकऱ्यांनी शेती व्यवसाय करताना उद्योग धंद्याची शेतीला जोड द्यावी त्यामुळे ग्रामीण खेडी आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण होती शेतकऱ्यांनी शेतीला उद्योगाची जोड देण्याची आव्हान साळुंखे सरांनी केले तर अध्यक्षीय समारोप करताना प्राध्यापक बाळासाहेब जोशी यांनी ग्रामीण भागात शासनाच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या योजनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली शासनाच्या या योजनेचा गावकऱ्यांनी लाभ घ्यावा व ग्रामीण भागाचा विकास करावा असे आव्हान केले ग्रामीण विकास म्हणजे सामाजिक आणि राजकीय विकास नव्हे तर शिक्षण आरोग्य रस्ते वीज शुद्ध पिण्याचे पाणी शेतीला मुबलक पाणी शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे आव्हान केले या कार्यक्रमाचे आभार लोखंडे यांनी मानले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल काळे यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उन्हाळ काळे गावातील ज्येष्ठ नागरिक युवक स्वयंसेवक यांनी मोलाचे सहकार्य केले कुणाल काळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले

चित्रकला परीक्षेत स्वामी अमृत भारती विद्यालयाचे यश

पिंपळवंडी। प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.गंगाभारती शिक्षण मंडळ संचलित श्री.स्वामी अमृत भारती विद्यालयाने एलिमेंट्री (चित्रकला) स्पर्धेत घवघवीत यश संपादन करून या स्पर्धेत विद्यालयाचा १००% टक्के निकाल लागला असून ए व बी ग्रेड मध्ये प्रत्येकी एक व सी ग्रेड मध्ये २४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे परिसरातील ग्रामस्थांकडून कौतुक केले जात आहे.ग्रेड-ए मध्ये साक्षी वैजनाथ थोरवे,ग्रेड-बी मध्ये अजय अशोक पवार तसेच ग्रेड-सी मध्ये अनुराधा अशोक दरे,आयर्न मनोज भराटे,आश्विनी बाळू जाधव, आस्था विष्णू जाधव,भारती शरद पवार,कार्तिक अशोक पवार,निशा बबन गाडे,प्रगती संतोष पवार,प्रगती विष्णू मुंडे,प्रणाली नाना पवार, प्रथमेश संभाजी चव्हाण,प्रतीक्षा अशोक

पवार,प्रतिमा पोपट पवार, पृथ्वीराज यशवंत जाधव,रोहन भाऊसाहेब कदम,समर्थ संजय भराटे, समर्थ सयाजी पवार,सानिका परमेश्वर पोकळे,सायली सुदाम पवार,शिवाजी विठ्ठल पवार,सोहम सुरेश पवार,सृष्टी अजिनाथ परदेशी,तनुजा अतुल राऊत,वैशाली शहादेव जायभाये यांचा समावेश आहे.यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा श्री.क्षेत्र अश्वस्त्थलिंग संस्थांनचे महंत ह.भ.प. स्वामी महादेवानंद भारती महाराज, तसेच मुख्याध्यापक ए.एम.पवार सर,सहसचिव प्रताप पवार सर, कला शिक्षक बापूराव बांडराव सर,प्रवीण मुळे सर,नजान सर,भोसले सर,लाड सर,डांभे सर,डिसले सर,जरे सर, श्रीमती गाडे मॅडम,चौधरी मॅडम, पोकळे मॅडम,अर्जुन भनगे,बिभीषन पवार,महादेव पवार,अक्षय शिंदे,गाडे छगन,वाल्हेकर,नारायण बजगुडे सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

गणेश विद्या मंदिर शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालूक्यातील अंमळनेर येथील श्री.गणेश विद्यामंदिर या शाळेची तीन दिवसीय शैक्षणिक सहल दि.१५,१६ व १७ जानेवारी रोजी यशस्वीरित्या पार पडली.सहली दरम्यान विद्यार्थ्यांना सर्वप्रथम सातारा येथील रयत शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यालय तसेच कर्मवीर समाधी परिसराचे दर्शन घडविण्यात आले.त्यानंतर कोल्हापूरजवळील कणेरी मठ त्यामधील म्युझियम,मायामहल, तारांगण व दिव्यगार्डन इ.गोष्टी नंतर कोल्हापूर येथील श्री.महालक्ष्मीदेवी मंदिर,शाहू पॅलेस,रंकाळा तलाव, रत्नागिरी जिल्ह्यातील श्री.क्षेत्र नाणीजधाम,थिबा पॅलेस,रत्नदुर्ग किल्ला,श्री.देवी भगवती मंदिर,सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्रातील सुमारे १३०० समुद्री जीवांचे नमुने व २५०

शिंपल्यांचे विविध प्रकार असलेले मत्स्यालय,आरेवारे बीच,गणपतीपुळे येथील स्वयंभू गणेशमंदिर,सुंदर समुद्रकिनारा,किल्ले प्रतापगड, महाबळेश्वर येथील महाबळेश्वर मंदिर, पंचगंगा मंदिर,वेण्णा लेक,सनसेट पाईंट व मार्केट इ.प्रेक्षणीय स्थळे दाखवण्यात आली.सहली दरम्यान विद्यार्थ्यांना कोकणातील जांभा खडकातील उतरत्या छपरांची घरे, भातशेतीची खाचरे,आंबा-काजू- सुपारी,नारळी-पोफळीच्या बागा, वनस्पतींचे विविध प्रकार,कोकणी मेवा,विविध कोकणी खाद्यपदार्थ व पेये,स्ट्राबेरीची शेती,कोकणातील नद्या,घाटरस्ते तसेच कोकणी लोकजीवनाविषयी माहिती मिळाली. सहलीचे नियोजन विद्यालयाचे सहल विभागप्रमुख एस.सी.पठाण सरांनी केले. सहलीमध्ये डूचे ,सानप आर.बी, खलाटे आर.डी, मेढे एच.एम, पंडागळे जे.टी, आंधळे एस.बी, सुळे जे.पी व ८३ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते.सहलीच्या नियोजनासाठी विद्यालयाचे पर्यवेक्षक जाधवर एफ.एस,जेष्ठ शिक्षक उढाणे पी.एस, काळे एस.बी,काकडे ए.ए,दहिफळे ए.एस,गाडीलोहार एम.एस,सदावर्ते ए.बी,केंद्रे ए.एचर,भांगे आर.एस., लेखनिक हुलगुंडे ए.जे,आव्हाड पी.एस,मोरे बी.जे,पोकळे ए.एम. यांनी परिश्रम घेतले.सहलीच्या सुरक्षित व यशस्वी आयोजना निमित्त विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक आर.एम.हाके सर यांनी सहल विभागप्रमुख तसेच सर्व सहभागी शिक्षकांचे तसेच पाटोदा आगाराचे बसचालक अनंता राख व ए.जे. मिसाळ यांचे आभार मानले.

जयभवानी चषकाचे शिनुभाऊ बेद्रे यांच्या हास्ते उद्घाटन

गेवराई। प्रतिनिधी

नगरपालिकेचे मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी यांचा १ जानेवारी रोजी वाढदिवस होता त्या निमित्त भगवती क्रिकेट क्लबच्या वतीने जयभवानी चषकांचे आयोजन करण्यात आले होते या दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेचे आज दि.१८ जानेवारीरोजी सकाळी११:०० वाजता शिवसेना तालुकाप्रमुख शिनुभाऊ बेद्रे यांच्या हास्ते उद्घाटन संपन्न झाले होते यावेळी मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी,विलास सुतार, नगरसेवक संजय इगले,नगरसेवक राम पवार, विनायक गिरी,समाधान मस्के, बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण, शेख निजाम, पिटु साळवे.दिपक अवघड, दाऊद पठाण, शेख शब्बीर,दिलीप सोनवणे,शेख

मुददशीर, शेख नसिर,रजित काबंळे,कृष्णा पाटोळे,बालाजी जाधव, वाजेद पठाण, शेख बाबा,राजेंद्र तातडीया, प्रदीप सुतार, अशोक नांडे, आदी उपस्थित होते, स्पर्धेचे समालोचन आविनाश माळवदे, यांनी केले आहे तर पंच म्हणून सुधीर जाधव यांनी योगदान दिले आहे तर आयोजन मनोज पाटोळे,दत्ता चव्हाण, रवि उफाड,डिगाबर गिरी, (कर्णधार) सोनु राठोड, अनिकेत मस्के,बंटी राठोड, सुनिल पवार, शैलेश टाक,सोनु भारती,शंकर खैरे,धनंजय जाधव, आरेफ शेख,अमोल कानाडे,दिलीप धुरंधरे,सुमित भुत्ते,मुन्नासेठ चौधरी,योगेश चव्हाण, शंकर उबदे, आरबाज बागवान, इम्मु बडा,बाळु चव्हाण,प्रवीण इंगळे,आकाश पवार, आदीनी परिश्रम घेतले भगवती क्रिकेट क्लबने आयोजित जय भवानी चषकांमध्ये भगवती क्रिकेट संघ, आर.के.संघ, रॉयलस्टार संघ,माही संघ,विलास सुतार संघ,डि.डी.संघ, पोलीस बॉइज संघ,एकता कल्ब संघ, पेटंर संघ, संघ, झुंजार संघ,आधार संघ आदी संघाने सहभाग घेतला.

किसान सभेचा वतीने पालकांचे बेमुदत धरणे आंदोलन

पाटोदा। प्रतिनिधी

चुंबळी येथील जिल्हापरिषद प्राथमिक शाळाचा विद्यार्थ्यांचे अनेक दिवसापासून अनेक प्रश्न प्रलंबित असून त्यावर शाळेतील शिक्षक व गटशिक्षण अधिकारी यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे जि.प.शाळेची दुरावस्था निर्माण झाली आहे विशेष म्हणजे गेल्या चार वर्षांपासून शालेय व्यवस्थापन समिती नाही त्यामुळे त्यांचे कार्य व आर्थिक व्यवहार काय चालले आहे हे काही समजत नाही शाळेतील विद्यार्थ्यांचा सकस आहार उदा. केळी,अंडी व बिस्कीट गेल्या दोन वर्षांपासून विद्यार्थ्यांना देण्यात आलेले नाही शाळेत गेल्या तीन वर्षांपूर्वी सोलर बसवलेले नसल्यामुळे शाळेतील मुला-मुलींना दूषित



पाण्याचा सामना करावा लागत असून ते सतत आजारी पडत आहेत. शाळेतील शिक्षक रजा देवून जातात व दुसऱ्या दिवशी येवून ते शिक्षक सबंधित रजिस्टर ला सह्या करतात. शाळेतील सकस आहार शिजवणाऱ्या विधवा महिलांचे मानधन गेल्या दोन वर्षापासून प्रलंबित आहे. त्याच बरोबर इ. पहिली चा वर्ग ऑनलाईन न केल्यामुळे एक शिक्षकाचे पद कमी झालेले आहे.शाळेत येणाऱ्या सर्व मानधनाची माहिती मिळण्यासाठी वरील प्रश्नावर चुंबळी गावचा विद्यार्थ्यांचे पालक दि. २१/०१/२०२५ पासून जि.प. शाळा चुंबळी समोर बेमुदत धरणेआंदोलन करणार आहेत असा प्रकारचे निवेदन १७/०१/२०२५ ला गटशिक्षण अधिकारी ता. पाटोदा यांना दिलेले आहे या निवेदनावर कॉ. महादेव नागरगोजे(उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य किसान सभा), प्रवीण पवळ, अनिल गोंदकर,भागवत सानप, विनोद पव्हणे, विकास पव्हणे इत्यादी पालकांचा सह्या आहेत तरी याची नोंद घ्यावी.

रखडलेल्या पाणीपुरवठा योजने संदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांना साकडे

धारूर। प्रतिनिधी

अंजनडोह येतील जल जीवन योजनेअंतर्गत असलेल्या पाणीपुरवठा योजनेचे काम अनेक महिन्यांपासून बंद असल्याने अंजनडोच्या सरपंचांनी थेट महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन संबंधित योजने संदर्भात प्रशासकीय अधिकारी व ठेकेदारांकडून दुर्लक्ष होत असल्याचे निवेदन दिले आहे.

अंजनडोह ग्रामस्थांना शाश्वत पाण्याची सोय व्हावी या उद्देशाने रेपेवाडी साठवण तलावावरून एक कोटी ४५ लक्ष रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर झालेली आहे या योजनेअंतर्गत सुरू असलेले काम मागील अनेक दिवसांपासून ठप्प आहे या कामाबाबत संबंधित ठेकेदार महादेव मातकर व

अधिकाऱ्यांना वेळोवेळी सूचना करूनही अद्याप काम पूर्ण झाले नसल्याने शिर्डी येथे सुरू असलेल्या राष्ट्रवादीच्या मंथन शिबिरात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित बालक मंत्री अजित दादा पवार यांची सरपंच प्रमोद सोळंके यांनी भेट देऊन गावात सुरू असलेल्या जल जीवन योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम ठेकेदाराने जाणीवपूर्वक बंद ठेवले असल्याने त्यास वारंवार विनंती करूनही काम सुरू करत नसल्याचे दिसते या योजनेचे काम पूर्ण करावे यासाठी वेळोवेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करूनही संबंधित ठेकेदार काम करत नाही उन्हाळ्यात गावावर मोठे पाणी संकट उद्भवते , गावातील उपलब्ध असलेले पाण्याचे स्त्रोत देखील मोठ्या प्रमाणावर बंद पडतात गावातील जनजीवन ही पाण्याअभावी मोठ्या प्रमाणावर विस्कळीत होते तसेच गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी शासकीय टँकरचा अवलंब करावा लागतो त्यामुळे शासनाच्या तिजोरीवर ही अतिरिक्त भार पडतो सदरील योजना कार्यान्वित झाल्यास गावकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून आपण विशेष लक्ष देऊन आमचा पाण्याचा प्रश्न कायमचा सोडवावा अशी विनंती केली. बीडच्या पालकमंत्री पदी निवड झाल्यानंतर जिल्ह्यातील कामासंदर्भात पहिलेच निवेदन अंजनडोह चे सरपंच घेऊन गेल्याने अजित पवारांनीही अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना करून आपला पाण्याचा प्रश्न सोडवला जाईल असे आश्वासित केले आहे.

पाटोदा उर्दु शाळेमध्ये बाल आनंद मेळावा साजरा

पाटोदा। प्रतिनिधी

दिनांक १७ डिसेंबर २०२४ शुक्रवार रोजी जिल्हा परिषद प्राथमिक उर्दु शाळा अरब गल्ली पाटोदा व तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उर्दु पाटोदा येथे बाल आनंद मेळावा साजरा करण्यात आला. यावेळी या आनंद मेळाव्यात लहान लहान चिमुकल्याने विक्रीसाठी समोसे , चणाचटपट, वडापाव,भजी,पोहे सह विविध प्रकारचे पदार्थ विकण्यासाठी आणले होते. यामध्ये विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळावे या उद्देशाने यंदाही या दोन्ही उर्दू शाळेमध्ये आनंद मेळावा घेण्यात आला होता.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सौ.फातेमा बी अमजद पठाण हे होते. यावेळी केंद्रप्रमुख श्री येवले सर,श्री राख सर,श्री बडे सर,श्री पठाण सर श्री हादी सर श्री नासेर सर शाळा व्यवस्थापन समिती सदस्या श्रीम अस्मा इम्रान पठाण श्रीम.तहेनियत वसीम सय्यद श्रीम हीना रौफ सय्यद श्रीम.हीना शाखेख पठाण हे उपस्थित होते. यावेळी शाळेच्या सहशिक्षिका श्रीमती रेश्मा मॅडम, तस्लीम मॅडम, तबस्सुम मॅडम , आसेफा मॅडम तसेच शाळेचे सहशिक्षक इम्रान सर तसेच केंद्रीय प्राथमिक शाळा पाटोदाच्या सर्व सहशिक्षिका जिल्हा परिषद शाळा भट गल्ली शाळेच्या सर्व सहशिक्षिका जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रंतीनगर चे सर्व सहशिक्षीका तसेच हजरत राज मोहम्मद उर्दु शाळेचे सर्व स्टाफ व उर्दु हाय स्कूल चा सर्व स्टाफ उपस्थित होता.

पीएम किसान योजनेच्या नियमात बदल होणार?

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं मोठं वक्तव्य

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. किसान योजनेत पारदर्शकता यायला हवी. तसेच खऱ्या अर्थाने गरजू शेतकऱ्याला या योजनेचा फायदा घेता यावा. यासाठी केंद्र सरकारने या योजनेच्या नियमात बदल केला असेल असं मला वाटतं असे वक्तव्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं आहे. त्यामुळं आता केंद्र सरकारनं नेमका पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेत कोणता बदल केला असेल? अशी चर्चा सर्वत्र सुरु आहे.

किसान सन्मान निधी योजनेच्या माध्यमातून दरवर्षी शेतकऱ्यांना ६००० रुपये मिळणार

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या माध्यमातून दरवर्षी शेतकऱ्यांना ६००० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. ही मदत ४ महिन्याला २००० रुपयांचा हप्ता या प्रमाणे दिली जाते. आत्तापर्यंत शेतकऱ्यांना जीएम किसान योजनेचे १८ हप्ते मिळाले आहेत. १९ वा हप्ता कधी मिळणार अशी देखील मोठ्या प्रमाणात चर्चा सुरु आहे. लवकरच म्हणजे पुढच्या फेब्रुवारी महिन्यात पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता मिळणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र, याबाबत

अधिकृत कोणताही माहिती मिळाली नाही. मात्र, अशातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महत्वाचं वक्तव्य केलं आहे. केंद्र सरकारने या योजनेच्या नियमात बदल केला असेल असं मला वाटतं असे एकनाथ शिंदे म्हणाले.

विश्वासाने सर्व लोक प्रवेश करत आहेत

निफाड, दिंडोरी, नाशिकच्या पदाधिकाऱ्यांसह नागपूरचे दुशंतचे चतुरवेदी (माजी आमदार) यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. या सर्वांचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वागत केलं. संपूर्ण राज्यातून शिवसेनेत प्रवेशाचा ओढा सुरु आहे. बाळासाहेबांचे विचार घेऊन प्रवेश केला जातोय असेही शिंदे म्हणाले. विधासभेत ६० आमदार देऊन जनतेने शिक्कामोर्तब केला आहे. विश्वासाने सर्व लोक येत आहेत असेही शिंदे म्हणाले. कल्याणकारी आणि लोकांभिमुख योजनेची पोचपावती आम्हाला मिळतेय. राज्यबाहेरील कार्यकर्ते, पदाधिकारी पक्षात येत आहेत असे शिंदे म्हणाले.

शिवसेना मोठ्या वेगाने पुढे जात आहे

शिवसेना मोठ्या वेगाने पुढे जातं आहे. राज्यात जिथे जिथे विकासाची आवशकता आहे तिथे तिथे आम्ही विकास करु या विशस्वासाने लोक येत आहेत असे शिंदे म्हणाले. आजचं स्वामीत्व योजना जाहीर केली आहे. सर्वसामान्य लोकांना न्याय देण्याचं काम मोदी करत आहेत. आज ६५ लाख लोकांना लाभ मिळाला असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. किसान योजनेत पारदर्शकता यायला हवी, खऱ्या अर्थाने गरजू शेतकऱ्याला या योजनेचा फायदा घेता यावा, प्रत्येक शेतकऱ्याला या योजनेचा फायदा घेता यावा यासाठी केंद्राने नियमात बदल केला असेल असं मला वाटत असेही शिंदे म्हणाले. विचारांशी तडजोड आणि बाळासाहेबांचे विचार सोडल्याने उबाठाची लोक येत आहेत. जिथे जिथे स्थानिक स्वराज्य संस्थांनाच्या निवडणुका आहेत तिथे तिथे आम्ही महायुती म्हणून निवडणुका लढवणार आहोत. काही ठिकाणी परिस्थिती नुसार कार्यकर्त्यांशी बोलून निर्णय घेतला जाईल असे एकनाथ शिंदे म्हणाले.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१७८८ : इंग्लडमधून हद्दपार केलेले गुन्हेगार वसाहतीसाठी ऑस्ट्रेलियातील न्यू साऊथ वेल्सच्या किनार्यावर उतरले. इथे वसाहत करण्यासाठी तयार झालेल्या गुन्हेगारांची शिक्षा माफ करण्यात आली होती.

१८४१ : ब्रिटिशांनी हाँगकाँग बेटाचा ताबा घेतला.

१९३७ : फ्रँकलिन डिलानो रूझवेल्ट यांनी अमेरिकेचे ३२ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून अमेरिकेच्या अध्यक्षपदाची शपथ घेतली. यानंतर २० जानेवारीलाच अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचा शपथविधी करण्याची प्रथा पडली.

१९४४ : दुसरे महायुद्ध रॉयल एअर फोर्सने बर्लिनवर २३०० टन बॉम्बवर्षाव केला.

१९४८ : महात्मा गांधींची हत्या करण्याचा चौथा प्रयत्न झाला. याआधी १९३४, १९४४ व १९४४ मध्ये त्यांची हत्या करण्याचे प्रयत्न झाले होते.

१९५७ : आशियातील पहिली अणुभट्टी पंतप्रधान पंडित जवाहरलालनेहरू यांच्या हस्ते देशाला अर्पण करुन ॲटॉमिक एनर्जी एस्टॅब्लिशमेंट (सध्याचे नाव भाभा अणुसंशोधन केंद्र) या संस्थेची स्थापना करण्यात आली.

१९६३ : चीन व नेपाळ या देशांत सरहद्दविषयक करार झाला.

१९६९ : क्रॅब नेब्युलात प्रथमत: पल्सार दिसून आला.

१९९८ : संगीत क्षेत्रातील नोबेल समजला जाणारा 'पोलार संगीत पुरस्कार' विख्यात सतारवादक पं. रविशंकर यांना जाहीर

१९९९ : गिरीश कर्नाड यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर

२००९ : अमेरिकेचे पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांचा शपथविधी झाला.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७५ : आंद्रे ॲम्पिअर फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १० जून १८३६)

१८६१ : मराठीमधील पहिल्या स्त्री कथा-कादंबतीकार, निबंधकार आणि सुधारक काशीबाई गोविंदराव कानिटकर यांचा जन्म.

१८७१ : सर रतनजी जमसेटजी टाटा टाटा घराण्यातील उद्योगपती व दानशूर व्यक्ति (मृत्यू: ५ सप्टेंबर १९१८)

१८८९ : महान देशभक्त आणि तपस्वी मसुरकर महाराज यांचा जन्म.

१८९८ : कृष्णाजी गणेश फुलंब्रीकर तथा 'मास्टर कृष्णराव' प्रतिभावान गायक, अभिनेते व संगीतकार, त्यांच्या गायनात ग्वाल्हेर, आग्रा व जयपूर घराण्यांचा संगम दिसून येई. 'वंदे मातरम'ला त्यांनी दिलेली चाल लोकप्रिय ठरली. (मृत्यू: २० आक्टोबर १९७४)

१९३० : चंद्रावर उतरणारे दुसरे अमेरिकन अंतराळवीर बझ आल्ड्रिन यांचा जन्म.

१९६० : आपा शेर्पा १९ वेळा माऊंट एव्हरेस्टवर यशस्वी चढाई करणारे नेपाळी गिर्यारोहक

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९१ : डेविड कालाकौआ हवाईचा राजा (जन्म: १६ नोव्हेंबर १८३६)

१९३६ : जॉर्ज (पाचवा) इंग्लंडचा राजा (जन्म: ३ जून १८६५)

१९५१ : अमृतलाल विठ्ठलदास ठक्कर ऊर्फ 'ठक्कर बाप्पा' समाजसेवक (जन्म: २९ नोव्हेंबर १८६९)

१९८० : कस्तुरभाई लालभाई दानशूर व राष्ट्रवादी विचारसरणीचे उद्योगपती, पद्मभूषण (१९६९), रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक (१९३७ १९४९). अरविंद मिल्स, अशोक मिल्स, अतुल असे अनेक गिरण्या व कारखाने त्यांनी चालू केले. आपल्या गिरण्यांत त्यांनी कामगार कल्याणासाठी सहकार संस्था काढल्या. (जन्म: १९ डिसेंबर १८९४)

१९८८ : खान अब्दुल गफार खान तथा 'सरहद गांधी' (जन्म: ३ जून १८९०)

१९९३ : ऑड्रे हेपबर्न ब्रिटिश अभिनेत्री, संयुक्त राष्ट्रांच्या बालक निधीच्या सदिच्छा प्रतिनिधी, 'रोमन हॉलिडे' या चित्रपटातील अभिनयाबद्दल त्यांना ऑस्कर पुरस्कार मिळाला. (जन्म: ४ मे १९२९)

२००२ : रामेश्वरनाथ काओ रिसर्च अँड ॲनॅलेसिस विंग () या भारतीय गुप्तचर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष. काओ यांना भारतीय गुप्तचर यंत्रणेचे अध्वर्यू मानण्यात येते. (जन्म: १० मे १९१८)

उन्हाळी तीळ लागवडीचे तंत्र

तीळ लागवड प्रामुख्याने खरीप, अर्ध रब्बी आणि उन्हाळी अशा तिन्ही हंगामांत केली जाते. तीळ लागवडीनंतर हवामानात अचानक बदल झाल्यास तिळाची प्रत खालावते. याउलट उन्हाळी हंगामातील तीळ लागवडीमध्ये अधिक उत्पादन मिळून प्रतही चांगली मिळते. पांढऱ्या शुभ्र रंग असलेल्या तिळाला बाजारभावही चांगला मिळतो. त्यामुळे शेतकऱ्यांचा उन्हाळी तीळ लागवडीकडे कल वाढलेला दिसत आहे. उन्हाळी हंगामातील तीळ लागवड अधिक फायदेशीर ठरते.

लागवडीची वेळ आणि कालावधी : उन्हाळी तीळ लागवडीसाठी १५ फेब्रुवारीपर्यंतचा काळ योग्य असतो. उगवणीसाठी किमान १५ अंश, कायिक वाढीसाठी २१ ते २६ अंश आणि फुलधारणेसाठी २६ ते ३२ अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते. तापमान ४० अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास फुलगळ होते. तसेच फुलधारणेच्या काळात जास्त पाऊस झाला तरीदेखील फुलगळ होते.

जमीन : मध्यम ते भारी, पाण्याची निचरा होणारी जमीन लागवडीस निवडावी. वालुकामय पोयट्याच्या जमिनीत पुरेसा ओलावा असल्यास पीक चांगले येते. पूर्वमशागत खोल नांगरट करून कुळवाच्या साह्याने जमीन भुसभुशीत करावी. किंवा रोटाव्हेटरच्या मदतीने जमीन तयार करावी. पेरणीपूर्वी जमिनीवर लाकडी फळी फिरवून जमीन दाबून सपाट करावी. म्हणजे उगवण चांगली होण्यास मदत होते.

तिळाचे सुधारित वाण व त्याचे गुणधर्म

जे.एल.टी ४०८-२ (फुले पुर्णा) : ही जात ८४ ते ९७ दिवसात पक्व होते. मूळ व खोड कुजव्या रोगास साधारण प्रतिकारक आहे. तेलाचे प्रमाण ४९ टक्के असून उत्पादन ७ ते ८ क्विंटल देते. ए.के.टी.-१०१ : ९० ते ९५ दिवसात पक्व होते. पर्णगुच्छ, मूळ व खोड कुजका रोगास सर्वसाधारण प्रतिकारक आहे. तेलाचे प्रमाण ४८ ते ४९ टक्के असून ७.५ ते ८ क्विंटल उत्पादन देते. बीजप्रक्रिया : प्रतिकिलो बियाण्यांस, थायरम ३ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम २.५ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम याप्रमाणे चोळावे. त्यानंतर ॲझेटोबॅक्टर अधिक पीएसबी

२५ ग्रॅम चोळावे. पेरणी : शक्यतो बैलचलित पाभरीने ३० बाय १५ सेंमी किंवा ४५ बाय १० सेंमी अंतरावर पेरणी करावी. पेरणीवेळी बियाणे २.५ सेंमीपेक्षा जास्त खोलीवर पडणार नाही, याची काळजी घ्यावी. बियाणे जास्त खोलीवर पडल्यास उगवणीवर परिणाम होतो. पेरणीसाठी हेक्टरी २.५ ते ३ किलो बियाणे पुरेसे आहे. विरळणी : पेरणीनंतर ८ ते १० दिवसांनी पहिली, तर १५ ते २० दिवसांनी दुसरी विरळणी करावी. हेक्टरी रोपांची संख्या २.२२ लाख इतकी ठेवल्यास फायदेशीर ठरते. खत व्यवस्थापन : शेवटच्या कुळवणी अगोदर चांगले कुजलेले शेणखत हेक्टरी ५ टन किंवा एरंडी पेंड १ टन याप्रमाणे जमिनीत मिसळावे. तीळ पिकास हेक्टरी ५० किलो नत्राची मात्रा द्यावी. पहिली अर्धी मात्रा २५ किलो नत्र पेरणीवेळी आणि उर्वरित मात्रा पेरणीनंतर २१ दिवसांनी द्यावी. नत्राची दुसरी मात्रा दिल्यानंतर पिकांस लगेच पाणी द्यावे. अधिक उत्पादनासाठी पीक फुलोऱ्यात आणि बोंडे वाढीच्या अवस्थेत असताना २ टक्के युरियाची फवारणी करावी.

आंतरमशागत : सुरुवातीच्या ३५ ते ४० दिवसांच्या कालावधीत तण नियंत्रण करणे गरजेचे आहे. त्यासाठी पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी पहिली कोळपणी आणि निंदणी करावी. तर ३० ते ३५ दिवसांनी दुसरी कोळपणी आणि गरजेनुसार निंदणी करून पीक तणविरहित ठेवावे. पाणी व्यवस्थापन : उन्हाळी तीळ पिकास जमिनीच्या मगदुराप्रमाणे १२ ते १५ दिवसांच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. फुले येण्याच्या आणि बोंडे धरण्याच्या काळात पाण्याचा ताण पडू देऊ नये.

बटेर पालन शेतकऱ्यांच्या हिताचा व्यवसाय

देशातील अनेक भागांमध्ये सध्या बटेर पालन (लावी पालन) व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कमी पाणी, कमी जागेत आणि कमी खर्चात देखील हा व्यवसाय केला जाऊ शकतो. ब्रॉयलर पोल्ट्री फार्मिंगच्या तुलनेत अल्प गुंतवणुकीमध्ये देखील या व्यवसायातून मोठ्या प्रमाणात नफा कमावला जाऊ शकतो.

बटेर हा आकाराने अगदी लहान असलेला पक्षी राज्यातील अनेक भागांमध्ये 'लावी', काही भागांमध्ये 'लावरी' या ग्रामीण नावांनी ओळखला जातो. या पक्षाचे मांस हे गुणवत्तापूर्ण असते. त्यामुळे लोक त्याची खरेदी करताना पैशाचा कोणताही विचार करत नाही.

या पक्षाच्या मांसाला अन्य पक्षांच्या तुलनेत किंमतही अधिक मिळते. शिवाय ब्रॉयलर कोंबडी पालनाच्या तुलनेत यासाठी येणारा खर्च देखील अत्यंत कमी असतो. ज्यामुळे सध्या देशात जवळपास ३२ दशलक्ष इतक्या जपानी बटेर प्रजातीच्या पक्षांचे व्यावसायिक स्वरूपात पालन केले जात आहे.

जपानी प्रजाती विकसित : पोल्ट्री फार्मिंग उद्योगामध्ये कोंबडीपालन, बदक पालन यानंतर बटेर पक्षांच्या पालनाला देशात तिसरे स्थान आहे. भारतात जवळपास १९७० च्या दशकापासून बटेर पक्ष्यांच्या संरक्षणासाठी कायदा करण्यात आला आहे. मात्र त्यानंतर देशात १९७४ साली व्यावसायिक पालनासाठी बटेर पक्षाची जपानी प्रजाती विकसित करण्यात आली आहे. त्यामुळे तेव्हापासून बटेर पालन मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

किती मिळतो नफा : पोल्ट्री क्षेत्रातील जाणकारांच्या मते, भारतामध्ये

जपानी बटेर पक्षाचे पालन सहजतेने केले जात आहे. एक दिवसाचे बटेरची छोटे पिल्ले विकत घेऊन कोणी व्यवसाय सुरु करत असेल तर ही पिल्ले जवळपास ५ आठवड्यांमध्ये विक्रीसाठी तयार होतात. दोन आठवड्यांची पिल्ले विकत घेतल्यास, एका पक्षावर जवळपास ३० ते ३१ रुपये खर्च होतो. तर खर्च वजा जात आपल्याला त्यातून प्रति बटेर पक्षी निम्मा नफा भेटू शकतो.

खाद्यासह शेडचा खर्चही कमी : बटेर पालन करण्यासाठी ब्रॉयलर कोंबडी पालनाच्या तुलनेत खूपच कमी जागा लागते. ३ फूट रुंद व ५ फूट उंच असलेले बांबू जाळीचे शेड बांधून, त्यात ४०-४५ बटेर पक्षी पाळले जाऊ शकतात. अर्थात १५ स्क्वेअर फूट जाळीमध्ये ३ लेअरमध्ये १३० ते १५० बटेर पक्षी पाळता येतात. बाजारात लहान पक्षांसाठीचे खाद्य उपलब्ध असते ते तुम्ही बटेर पक्षांसाठी खरेदी करू शकता. एका बटेर पक्षाला एका दिवसासाठी सरासरी ५-१० ग्रॅम खाद्य आवश्यक असते.

अंडी विक्रीतूनही नफा : बटेर हा मांस उत्पादनासाठी पाळला जात असला तरी त्याच्या अंड्यांना देखील मोठ्या प्रमाणात मागणी असते. त्यामुळे पूर्ण विकसित झालेला ५ आठवड्यांचा पक्षी मांस विक्रीसाठी विक्री करण्याअगोदर त्यापासून मिळणाऱ्या अंड्यांमधून देखील आर्थिक कमाई केली जाऊ शकते. त्यामुळे या व्यवसायातून दुप्पट नफा कमावता येतो. ग्रामीण भागात लावीच्या अंड्यांना मोठी मागणी असते. तसेच सध्या आरोग्याच्या दृष्टीने जागरूकता वाढल्याने शहरातही या अंड्यांना मागणी असते.

तापमानात वाढ होत असताना पीक व्यवस्थापन

साधारणपणे फेब्रुवारी महिन्यापासून तापमानात वाढ होताना दिसून येते. हवामानात होणारा हा बदल पिकांच्या आरोग्यासाठी हानिकारक असतो. तापमानात वाढ होत असताना व्यवस्थित पीक व्यवस्थापन करणे खूप गरजेचे आहे. फळबाग, भाजीपाला, फुलशेती असले तर शेतकऱ्यांनी अशा वेळी काय काळजी घ्यावी याबाबत आम्ही आज तुम्हाला सविस्तर कृषी सल्ला देणार आहोत. योग्य वेळी योग्य ती खबरदारी घेतली तर शेतीमधील संभाव्य नुकसान टाळून फायदेशीर शेती नक्की करता येते.

हरभरा पीक :कमाल तापमानात झालेली वाढ व वाढलेल्या बाष्पोत्सर्जनाच्या वेगामूळे उशीरा पेरणी केलेल्या हरभरा पिकास आवश्यकतेनूसार तूषार सिंचन पध्दतीने पाणी द्यावे. पिकात पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. उशीरा पेरणी केलेल्या हरभरा पिकात घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थानासाठी शेतामध्ये इंग्रजी आकाराचे प्रति एकर २० पक्षी थांबे लावावेत व घाटेअळीच्या सर्वेक्षणासाठी प्रति एकरी २ कामगंध सापळे लावावेत. हरभरा पिकात घाटे अळीच्या व्यवस्थानासाठी ५% (एनएसकेई) निंबोळी अर्क किंवा क्विनॉलफॉस २५% इसी २० मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५% ४.५ ग्राम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

करडई पीक व्यवस्थापन :कमाल तापमानात झालेली वाढ व वाढलेल्या बाष्पोत्सर्जनाच्या वेगामूळे उशीरा पेरणी केलेल्या करडई पिकास आवश्यकतेनूसार पाणी द्यावे. करडई पिकात माव्याचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३०% १३ मिली किंवा असिफेट ७५% १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

हळद व्यवस्थापन : हळद काढणी करण्यापूर्वी पंधरा दिवस आधी पिकाला पाणी देणे बंद करावे. हळद पिकाची पाने पिवळी पडून जमिनीवर लोळतात तेव्हा हळदीची काढणी करावी. कंद काढणीपूर्वी संपूर्ण पाने जमिनीलगत कापून घ्यावी.

ऊस व्यवस्थापन :कमाल तापमानात झालेली वाढ व वाढलेल्या बाष्पोत्सर्जनाच्या वेगामूळे ऊस पिकास आवश्यकतेनूसार पाणी द्यावे. ऊस पिकावर खोड किडीचा प्रादूर्भाव दिसून आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २० % २५ मिली किंवा क्लोरॅट्रानोलीप्रोल १८.५% ४ मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

उन्हाळी तीळ व्यवस्थापन :कमाल तापमानात झालेली वाढ व वाढलेल्या बाष्पोत्सर्जनाच्या वेगामूळे वेळेवर पेरणी केलेल्या उन्हाळी तीळ पिकास मध्यम जमिनीत ८ ते १० दिवसांनी व भारी जमिनीत १२ ते १५ दिवसांच्या अंतराने सिंचन करावे. सिंचन हे शक्यतो तूषार सिंचन पध्दतीने करावे.

गर्भवती महिला, बाह्यरुग्ण आणि नातेवाईकांनी नैसर्गिक विधीसाठी जायचे कुठे?

जिल्हा रुग्णालयातील सार्वजनिक स्वच्छतागृहाला ७ महिन्यांपासून टाळे

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हा रूग्णालयाच्या आवारात असलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहाला ७ महिन्यांपासून टाळे लागले असून सोनोग्राफी ताटकळत असलेल्या गर्भवती महिला तसेच जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल रूग्णांना भेटण्यासाठी आलेले नातेवाईक तसेच बाह्यरुग्ण विभागात तपासणीसाठी व उपचारासाठी आलेले आणि अपघाती रूग्णांसोबत येणारे नातेवाईक असा जिल्हा रुग्णालयात रोज हजारों लोकांचा राबता असतो .मात्र जिल्हा रुग्णालयातील सार्वजनिक स्वच्छतागृहाला टाळे असल्याने नैसर्गिक विधीसाठी कोठे जायचे असा प्रश्न असुन एकवेळ पुरूष समोरच्या पार्किंगच्या जागेत लघुशंकेसाठी जाऊ शकतात मात्र महिलांची शारीरिक आणि मानसिक कुचंबणा होत असुन महिलांची हेळसांड होत असुन तातडीने स्वच्छतागृहे सुरू करण्यात यावे अशी मागणी

सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी करत बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांना केली असुन सांगा डॉ . अशोक थोरात साहेब सोनोग्राफीसाठी ताटकळत असलेल्या गर्भवती महिलांनी नैसर्गिक विधीसाठी जायचे कोठे?? असा सवाल केला आहे. बीड जिल्हा रुग्णालयात बाह्यरुग्ण विभागात (ओपीडी) तपासणी व उपचारासाठी रोज एक हजारांहुन आधिक रूग्णांची नोंद असते.सर्व उपचार व तपासण्या मोफत केल्यापासुन रूग्ण संख्येत कमालीची वाढ झाली आहे.आंतररुग्ण (आयपीडी) विभागात देखील ४०० च्या घरात रुग्ण उपचारासाठी दाखल असतात. या दोन्ही रूग्णांचे नातेवाईक आणि बाह्य रुग्ण विभागात तपासणीसाठी आलेले रुग्ण अशी जिल्हा रुग्णालयात राबता असलेल्या नागरिकांची संख्या हजारोंच्या घरात आहे.मात्र रूग्णालयाच्या आवारात एकही सार्वजनिक स्वच्छता नाही याचा फटका नातेवाईक महिला व महिला रूग्णांना बसतो. महिला रूग्णांना तज्ञ डॉक्टरांकडून सोनोग्राफीसाठीची तपासणी सुचवल्या नंतर व विशेषतः गर्भवती महिलांना हि तपासणी करण्यासाठी तासं तास ताटकळत थांबावे लागते. सोनोग्राफीकरणा-या तज्ञांची संख्या आणि एकच सोनोग्राफी असल्याने वेळ लागतो. एवढ्या वेळात नैसर्गिक विधीसाठी या महिलांनी जायचे कुठे?? ग्रामीण भागातील आलेल्या महिलांची विशेषतः हेळसांड होत आहे. सदर स्वच्छतागृह लवकरच सुरू करण्यात येईल.तसेच माता व बालसंगोपन रूग्णालयाच्या नवीन बांधलेल्या इमारतींमध्ये खालच्या मजल्यावर मोठे स्वच्छतागृह आहे.त्याचा वापर सुरू करून स्वच्छतागृहाची अडचण सोडवण्यात येईल असे बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी डॉ.गणेश ढवळे यांना आश्वासन दिले.

बीडच्या पालकमंत्रीपदी अजित पवार,पेढे वाटून आनंदोत्सव

पाटोदा। प्रतिनिधी

बीडचा पालकमंत्री कोण होणार या प्रश्नाला पूर्ण विराम मिळणार आहे.राज्यातील सर्वच जिल्ह्या साठी पालकमंत्र्यांचे नाव कधी घोशीत होणार या कडे सर्व राज्याचे लक्ष लागले होते. अखेर या गोष्टीला पूर्ण विराम मिळाला असून आज सर्व पालकमंत्री महोदयांची यादी जाहीर करण्यात आली.केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राज्यभर झालेल्या आंदोलनानंतर अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांना बीडचे पालकमंत्री पद देऊ नये अशी मागणी समोर आली होती.

अनेक दिवसांपासून बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी कोणाची निवड होणार म्हणून पुर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते. या.दरम्यान सरकारने काल जाहिर केलेल्या यादीनुसार बीडचे पालकमंत्री अजित (दादा) पवार असणार आहे. व अजित दादा पवार कडे बीड पालकमंत्रिपद देण्यात आलं आहे. हि.वार्ता जेव्हा पाटोदा तालुक्यात पसरली तेव्हा पाटोदा तालुक्यातील चुबंळी ग्रामपंचायत व समस्त गावकरी यांच्याकडून मिठाई वाटप करुन आनंदोत्सव साजरा करण्यात आला.ना अजित दादांना पालकमंत्री पद दिल्याबद्दल विकास व नवीन कामांना गती मिळेल असा विश्वास प्रवीण पवळ व समस्थ ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. यावेळी चुंबळी सरपंच बंन्धु गावचे युवा नेते प्रविण पवळ सह ग्रामपंचायत अधिकारी व पदाधिकारी,ग्रामस्त व कार्यकर्ते उपस्थित होते.

थोडक्यात

आधार हॉस्पीटल आयसीयुचा स्थलांतर व लोकार्पण सोहळा

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याहस्ते सोमवार दि. २० जानेवारी रोजी येथील भोकरदन नाका ते नवीन मोंढा रस्त्यावरील आधार हॉस्पीटल आणि आयसीयुचा स्थलांतर व लोकार्पण सोहळा पार पडणार आहे. सकाळी १० वाजता आयोजित या कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी माजी केंद्रीय रेल्वेराज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांची उपस्थिती राहणार असून या समारंभास पर्यावरणमंत्री पंकजाताई मुंढे, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव,कामगार मंत्री आकाश फुंडकर, आरोग्य राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, आ. सत्यजित तांबे, आ. मनोज नंदाताई देवानंद कायंदे, ॲड. नाझेर काझी राहणार आहे. आधार हॉस्पीटलच्या लोकार्पण सोहळ्यास सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन डॉ. राजीव डोईफोडे, डॉ.वर्षा डोईफोडे, डॉ. गणेश कानडे, सौ.सविता कानडे, डॉ. मनिष देशमुख, डॉ.अंजली देशमुख, श्रीकांत सपकाळ, ललित गिते, विजय जाधव, विठ्ठल जाधव यांच्यासह श्रीमती सुशिला नामदेराव कानडे, सौ. इंदूबाई डोईफोडे, सौ.कालिंदा जायभाये, सौ. इंदूबाई देशमुख, दौलतराव डोईफोडे, गजानन जायभाये, भरतराव देशमुख आदींनी केले आहे.

डॉ. हेडगेवार जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

माजलगाव। प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात प.पू. डॉ हेडगेवार जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे दि २३ जानेवारी गुरुवार रोजी आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा इयत्ता ८ वी ते १० वी गटासाठी आहे. या स्पर्धेचे विषय 'अहिल्यादेवी होळकरांचे धर्मकार्य व राष्ट्रीय दृष्टिकोन' व 'माझी मराठीची बोलू कौतुके...' या दोन पैकी एका विषयावर स्पर्धकाने आपले विचार सात मिनिटात मांडावे. स्पर्धकांनी आपल्या शाळेच्या मुख्याध्यापकांच्या अनुमतीने ९८५०४१८१३० , ९६३७९८४९८५ तसेच १९६६.. या संकेतस्थळावर प्रवेश नोंदणी करावी. या स्पर्धेत प्रथम बक्षीस २००१/- रुपये, द्वितीय बक्षीस १५०१/- रुपये, तृतीय बक्षीस १००१/- रुपये तर उत्तेजनार्थ बक्षीस ५०१/- रुपये (सर्व विजेत्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार असून सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल.) बीड जिल्ह्यातील माध्यमिक शाळेने आपल्या शाळेतून एक स्पर्धक पाठवून सहभाग नोंदवावा असे आवाहन श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह अड विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर यांनी केले आहे.

फुलसांगवीत सर्व रोग निदान व रक्तदान शिबिर संपन्न शिबिर

फुलसांगवी । प्रतिनिधी

श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ४९ व्या पुण्यतिथी निमित्त जन्मभूमी मौजे फुलसांगवी येथे गेल्या पाच दिवसापासून भव्य स्वरूपात अखंड हरिनाम सप्ताह पार पडत आहे. या सप्ताहासाठी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी आज दि. १९ जानेवारी रोजी सर्व रोग निदान शिबिर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते याला उदंड प्रतिसाद मिळाला आहे.

शिरूर कासार तालुक्यातील मौजे फुलसांगवी येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ४९ व्या पुण्यतिथी निमित्त श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे मठाधिपती महंत जनार्धन महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली गेल्या पाच दिवसापासून भव्य स्वरूपामध्ये अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद्? भागवत कथा नामयज्ञ सोहळा मोठ्या थाटात पार पडत आहे. फुलसांगवी ग्रामस्थांच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र भरातील नामांकित कीर्तनकार सह कथाकरांना कार्यक्रमासाठी आयोजित केले असल्याने हा कार्यक्रम प्रति वर्षाप्रमाणेच भव्य स्वरूपात पार पडत आहे. यामुळे पंचक्रोशीतून भाविक भक्त या सप्ताहाला आपली हजेरी लावून अध्यात्मिक ज्ञानरसाचे सेवन करत आहेत. त्याचबरोबर भाजी भाकरीच्या भोजनाचाही आनंद लुटत आहे. या सप्ताहामध्ये विविध धारक कार्यक्रमाची मोठी रेलचेल असल्यामुळे व साधुसंतांच्या उपस्थितीमुळे हा सप्ताह पंचक्रोशीतील भाविक भक्तांसाठी संत संग घडवून आणणारी अध्यात्माची पर्वणीच ठरत आहे. सप्ताह आलेल्या भाविक भक्तांच्या आरोग्याची काळजी येथील सप्ताह समितीच्या वतीने रविवार दि. १९ जानेवारी रोजी या ठिकाणी सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तर रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असे मानत रक्तदान करण्याचाही उपक्रम प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही राबवला आहे. या दोन्ही उपक्रमाला भरभरून प्रतिसाद मिळाला आहे.

फुलसांगवी येथील सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या सर्व रोग निदान शिबिर व रक्तदान शिबिरा शुभारंभ श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे मठाधिपती महंत जनार्दन महाराज यांच्या हस्ते करण्यात आला असून या उपक्रमांमध्ये भाविक भक्तांनी आपल्या प्रकृतीची तपासणी करून घ्यावी व आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये तरुणांनी सदैव सहभागी राहून रक्तदान केले पाहिजे. कारण आपल्या रक्ताच्या थेंबामुळे कोणाचातरी जीव वाचणार आहे कोणालातरी हे जग पुन्हा पाहण्याचा संधी मिळणार आहे . म्हणून रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जात आहे. रक्तदान शिबिरामध्ये फुलसांगवी गावातीलच नव्हे तर पंचक्रोशीतील तरुणांनी सहभाग घेऊन सदैव रित्या रक्तदान केले पाहिजे असे मत महाराजांनी व्यक्त केले आहे. यावेळी श्री संत वामनभाऊ महाराज विश्वस्त समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दर रविवारी कुषी दुकाने बंद

वडवणी तालुका कृषी असोसिएशनचा निर्णय

वडवणी। प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील सर्व कृषी साहित्य विक्रेत्यांनी आज पासून प्रत्येक आठवड्यातून एक दिवस १५ जानेवारी ते १५ मे पर्यंत प्रत्येक रविवारी दुकान बंद ठेवण्याचा निर्णय वडवणी तालुका कृषी असोसिएशन ने घेतला आहे. वडवणी तालुक्यातील कृषी व्यापारी बांधवांच्या उपस्थितीत नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. वडवणी तालुक्यातील लहान-मोठे एकही कृषी दुकान रविवारी सुरू राहणार नाही, असा ठराव या बैठकीत करण्यात आला.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आपण आपल्याला आगोदर एक जिवंत माणूस आहोत हे लक्षात घेतले पाहिजे. तरच आपल्याला आरोग्य धनसंपदा कळली आहे असे म्हणता येईल. माणसाच्या जीवनात पैसा हाच सर्वस्व नसतो त्या पलीकडे हि काही माणसाचं वैयक्तिक जिवन असतं खरं पाहिलं तर व्यापाऱ्यासारखा सतत कामातच गुंतणार दुसरा वर्ग नाही, मग तो व्यापारी कशाचा का असेना. शेतकऱ्यांना तरी वापसा मोडला म्हणून का होईना सुट्टी मिळते पण व्यापाऱ्याचा माञ कधीच वापसा मोडत नाही. नोकरदारांना पण आठवड्याला सुट्टी मिळते.ते लोकं सुट्टी दिवशी स्वत:ला वेळ देतात,कुटुंबाला वेळ देतात.काही आवडी-निवडी चे कामं करतात या धावपळीच्या जिवनातून एक दिवस का होईना पण ते रिलॅक्स होतात. त्यामुळे एक दिवस सुट्टीचा निर्णय सर्व कृषी व्यापाऱ्यांनी घेतला आहे. वडवणी तालुक्यातील सर्व ग्रामीण मधील व शहरांमधील दुकानदारांनी आप-आपली कृषी दुकान प्रत्येक रविवारी बंद ठेऊन वडवणी तालुका कृषी असोसिएशन ला सहकार्य करावे असे आवाहन वडवणी तालुका कृषी असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे.

माजलगाव:- येथील आझाद क्रांती सेना मध्यवर्ती कार्यालय येथे दि १९ जानेवारी रविवार रोजी स्व.कर्मवीर एकनाथराव आव्हाड (जिजा) यांची जयंती साजरी करण्यात आली व त्यांच्या कार्यास विनम्र अभिवादन करताना आझाद क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष राजेश घोडे, अशोक ढगे यांच्यासह आझाद क्रांती सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

जय भवानी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मोजे बांगरवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष शिबिर उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून ह ह भ प लक्ष्मण महाराज सस्ते हरिभक्त पारायण पांडुरंग पवळ व्यासपीठावर पाटोदा नगरपंचायत चे सभापती हनुमंतराव काळे विद्यापीठ आधी सभा सदस्य प्राध्यापक डॉक्टर कल्पना घारगे मॅडम इंग्रजी विभाग प्रमुख प्राध्यापक विनोद किर्दक गावातील ज्येष्ठ नागरिक उमाजी काळे कार्यक्रमाधिकारी डॉ शिवाजी काकडे उपस्थित होते सर्वप्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी व राष्ट्रसंत गाडगे महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला यानंतर या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ डॉ शिवाजीराव काकडे यांनी या शिबिराच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वेगवेगळ्या उपक्रम राबविण्यात येणार आहेत वेगवेगळ्या विषयावर व्याख्याने होणार आहेत या शिबिरात सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन केले तर प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना ह भ

प पांडुरंग महाराज पवळ यांनी खऱ्या अर्थाने समाजसेवा आणि राष्ट्र सेवा जर करायची असेल तर महात्मा गांधी आणि राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या विचाराचे आपण पाईक झालो पाहिजे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी देशाला राष्ट्रसेवेचा समाजसेवेचा संदेश दिला तो आपण अंगीकारला पाहिजेत अशा शिराच्या माध्यमातून आपण आपले भवितव्य घडविले पाहिजे असे मौलिक आव्हान पवळ महाराज यांनी केले तर हरिभक्त पारायण लक्ष्मण महाराज सस्ते बांगरवाडी कर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना या देशाचा इतिहास हा सेवेकऱ्यांचा असून संत ज्ञानेश्वर पासून वेगवेगळ्या संतांनी व महापुरुषांनी सेवा करून आपल्या जीवनाबरोबर समाज व राष्ट्राची उन्नती केली विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर राष्ट्रसंतांच्या तत्वज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे आणि आपले भवितव्य घडविले पाहिजे अशी मुली आव्हान केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी शिबिराच्या माध्यमातून आपल्या विविध कला मुलांना वाव देऊन आपला विवेक या ठिकाणी जागृत ठेवावा विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या आपल्यातील कला गावकऱ्यांना दाखवाव्या संगीत पर्यावरण राष्ट्रभक्ती जय शिबिरातून दर्शन घडले पाहिजे असे विचार मांडले या कार्यक्रमाची आभार प्राध्यापक डॉक्टर अशोक देवगुडे सर यांनी केले तर सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक डॉ लोखंडे बी बी यांनी केले या कार्यक्रमासाठी इंग्रजी विभागातील प्राध्यापक संदीप किवणे सांस्कृतिक विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक रामकृष्ण प्रधान राष्ट्रीय सेवा योजनेचे सहकार्यक्रमाधिकारी शिवाजीराव भोरे यांनी यांनी सहकार्य केले या उद्घाटन कार्यक्रमासाठी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते उमाजी काळे व ज्येष्ठ नागरिकांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला शाळेच्या मुख्याध्यापका सौ घुमरे मॅडम यांनी सहकार्य केले तर सहशिक्षक ईश्वर काळे मुख्याध्यापक कुडके सर यांनीही सहकार्य केले या शिबिरात राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते गावकऱ्यांनी मोठे सहकार्य केले दत्ता काळे ईश्वर काळे सिद्धेश्वर काळे गणेश काळे महादेवराव काळे बाळासाहेब काळे अमोल काळे बंडू नाना काळे अरुण काळे यांनी मोलाचे सहकार्य केले विद्यार्थ्यांनी शिबिरात संगीत गीत गायनाचा कार्यक्रम केला राष्ट्रपर गीत व साजरीकरण केले कुणाल काळे यांनी मोलाचे भूमिका बजावली.

सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती किल्ले धारूर कार्यकारिणी जाहीर

अध्यक्षपदी बालाजी शिनगारे तर सचिवपदी मनोज जगताप

धारुर। प्रतिनिधी

स्व. नामदेव भाऊ शिनगारे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती किल्ले धारुरची बैठक १८ जानेवारी रोजी संपन्न झाली. यावेळी अध्यक्षपदी बालाजी शिनगारे उपाध्यक्षपदी प्रताप शिनगारे तर सचिवपदी मनोज जगताप यांची निवड करण्यात आली. किल्ले धारुर शहरात स्व. नामदेव भाऊ शिनगारे यांच्या संकल्पनेतून व त्याच्यानंतर सुदर्शन भैय्या शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली गेली ३६ वर्षपासुन छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या थाटामाटात उत्सहात साजरी करण्यात येते. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती किल्ले धारुर वतीने शिवजयंती थाटामाटात साजरी करण्यात येणार आहे त्या अनुषंगाने १८ जानेवारी वार शनिवार रोजी सुदर्शन भैय्या शिनगारे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती किल्ले धारुर अध्यक्ष पदी बालाजी प्रकाश शिनगारे,उपाअध्यक्ष पदी प्रताप भाऊ शिनगारे,सचिव पदी मनोज दादा जगताप,सहसचिव पदी संकेत शिनगारे,कोषाध्यक्ष पदी आण्णासाहेब गोन्ने,सहकोषाध्यक्ष पदी जीवन पुजदेकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी मिरवणुक प्रमुखपदी नागेश भाऊ शिनगारे,श्रीनिवास शिनगारे,भागवत लांडगे,प्रशांत बापु शिनगारे,विश्वास शिनगारे,अशोक जगताप,अमोल शिनगारे,बालाजी शिनगारे,हरिभाऊ मोरे,प्रशांत शिनगारे,अमरजित शिनगारे,अजित शिनगारे, बाळासाहेब शिनगारे,महेश साखरे,अशोक शिनगारे,धनंजय शिनगारे,आविनाश साखरे,विजय शेळके यांनी निवड करण्यात आली. यावेळी निलेश शिनगारे,आकाश शिनगारे, पवन शिनगारे,दत्ता धुमरे,यांच्यासह असंख्य शिवप्रेमी शिवभक्त उपस्थित होते.

अत्याचाराला वाच्या फोडण्यासाठी महिलांनी सक्षम व्हावे

महिला मेळाव्यात बीड जिल्ह्याचे एसपी नवनीत कॉवत यांचे महिला सुरक्षेसाठी आवाहन

सिरसाळा । प्रतिनिधी

श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय गृहविज्ञान विभाग, फिनिक्स ग्रुप,विशाखा समिती, अं.गु.हमी कक्ष व भाई उद्धवराव पाटील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय सिरसाळा यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक नवनीत कावत हे उपस्थित होते. यावेळी बोलताना ते म्हणाले, स्त्री-पुरुषातील भेदभाव कमी झाला पाहिजे, समाजात स्त्रियांना मानाचे स्थान मिळावे म्हणून याची सुरुवात आपल्या

घरापासूनच करावी. त्यासाठी घरात मुलांना आणि मुलींना समान वागणूक द्या.महिला अत्याचार कमी करायचे असतील तर चांगल्या संस्कारातून ते कमी करता येतील. महिलावरील अत्याचाराची सुरुवात घरातून होते. संस्कारातून ती रुजवली जाते. उदा. मुलींनी सातच्या आत घरात. मुलगा उशिरा आला तरी चालतो. घरकाम मुलींनीच करायचं असतं अशी उदाहरणे देऊन त्यांनी महिलांवर अत्याचार कशा पद्धतीने केले जातात हे अधोरेखित केल.

अत्याचाराला दुर्लक्षित करू नका. अत्याचाराला विरोध करायला शिका. महिलांच्या संरक्षणासाठी अनेक कायदे आहेत. कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी अत्याचाराला दुर्लक्षित करू नका. छोटे छोटे गोष्टींची नोंद पोलीस स्टेशनला करा. त्यामुळे पोलीस यंत्रणा सतर्क राहून,चुकीच्या मानसिकतेला कायद्याचा धाक निर्माण होण्यास मदत होईल. समानतेचे संस्कार कुटुंबातून व्हावेत. कुटुंब हे संस्काराची पहिली पाठशाळा आहे. समानतेचे संस्कार कुटुंबातून व्हावेत. मुलगा आणि मुलीला समान वागणूक द्या. समान शिक्षण द्या. प्रत्येक क्षेत्रात मुली मुलांपेक्षा सरस असल्याचे दिसून येते. दहावी बारावी मध्ये टक्केवारी मध्ये मुली पुढे असतात. मग पुढे उच्च शिक्षणात मुलींचा टक्का कमी का होतो?.याला कारणीभूत दुय्यम वागणूक आहे. समाजाची मानसिकता आहे. घरातून सुविधा देताना मुलांना झुकत माप असतं.मुलींना दुय्यम वागणूक घरातून दिली जाते. समानतेचे संस्कार कुटुंबातूनच व्हावेत. घराच्या प्रमुखा कडून भेदभाव होऊ नये बरोबर सर्वांना वागणूक द्यायला हवी शिक्षण घेऊन जीवनात स्वतःची ओळख निर्माण झाली तर कुणीही तुम्हाला चॅलेंज करू शकत नाही. तुम्ही सगळे साथ द्या आपण सगळे मिळून बीडचे चित्र बदलून टाकू. ◀◀ पान २ वर

बीड जिल्हा तबलीग जमातचे प्रमुख सय्यद नजीब मौलाना यांच्या जनाजा नमाजसाठी प्रचंड गर्दी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील तबलीग जमातचे अमीर (प्रमुख) सय्यद नजीब मौलाना सहाब बांचे शनिबार दि. १८ जानेवारी २०२५ रोजी रात्री ९:३० वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. आज रविवारी सकाळी ११.३० वाजता शहरातील बिंदुसरा नदी परिसरातील इजतेमा मैदानात त्यांची जनाजा नमाज अदा करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्याचे तबलीक जमातचे प्रमुख (अमीर सहाब) हाफीज मंजुर सहाब, मौलाना महेमुद सहाब, मौलाना लईक सहाब, मौलाना रईस तहाब, यांच्यासह राज्यातील अलिम, मुफ्ती, मौलाना आणि जिल्हाभरातून आलेले मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर मासूम कॉलनी मोमीनपुरा येथील कब्रस्तानमध्ये त्यांचा दफन विधी करण्यात आला.

◀◀ पान २ वर

पुनमचंदजी लखेरा यांचे निधन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील जुन्या पिढीतील प्रिंटिंग प्रेस चालक पुनमचंदजी धन्नुलालजी लखेरा यांचे रविवारी पहाटे येथे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते ८४ वर्षाचे होते.

त्यांच्या पार्थिवावर दुपारी चार वाजता रेणूकाई परिसरातील राजस्थानी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. येथील दै. पार्श्वभूमीचे वार्ताहर प्रकाश पुनमचंद लखेरा यांचे ते वडील होते. १९६० च्या दशकात अंबाजोगाई शहरात पहिली प्रिंटिंग प्रेस सुरू करण्यात त्यांचा पुढाकार होता. पायडल मारून ट्रेडल सारख्या यंत्रावर अक्षर जुळवून प्रिंटिंग करण्यात लखेरा बंधूचा हातखंडा होता. काळाप्रमाणे या व्यवसायात बदल करीत ऑफसेट प्रिंटिंग व्यवसायातही त्यांनी पदार्पण केले. ◀◀ पान २ वर

महसूल विभागाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हा महसूल विभागाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धाचे आज येथील जिल्हा पोलीस मैदानावर आयोजन करण्यात आले होते. जालना जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांच्या हस्ते क्रिडा स्पर्धाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची उपस्थिती होती. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी रीता मैत्रवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उप जिल्हा

निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, उपजिल्हाधिकारी सविता सुत्रावे यांच्यासह सर्व उपजिल्हाधिकारी सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार तसेच सर्व कर्मचारी उपस्थित होते. आज पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत महसूल विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी विविध क्रीडा प्रकारांमध्ये आपला सहभाग नोंदवला. या क्रीडा स्पर्धांमधून उत्कृष्ट खेळाडूंची निवड करून सदर उत्कृष्ट खेळाडू हे आगामी फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या विभागीय क्रीडा स्पर्धेत आपला सहभाग घेणार आहेत.

प्रगतीच्या 'नवस' एकांकिकेस सर्वोत्कृष्ट एकांकिका तृतीय पारितोषिक

बीड । प्रतिनिधी

सुप्रिया प्रोडक्शन च्या वतीने दैनिक वृत्तमानस आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती शाखा यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या आठव्या राज्यस्तरीय बोलीभाषा एकांकिका स्पर्धेमध्ये प्रगती सेवाभावी संस्था पाडळी ता. शिरूर कासार जि.बीड या संस्थेच्या नवस या एकांकिकेस सर्वोत्कृष्ट एकांकिका तृतीय पारितोषिकासह उत्कृष्ट अभिनेता संतोष पैठणी, उत्कृष्ट

अभिनेत्री अंकुर तांगडे, उत्कृष्ट प्रकाश योजना श्याम चव्हाण, उत्कृष्ट रंगभूषा मानसी जाधव व उत्कृष्ट देशभूषा सचिन पंडित हे मानकरी ठरले.

अखिल महाराष्ट्रात वर्षभरात अनेक एकांकिका स्पर्धा आयोजित केल्या जातात या स्पर्धेतून नवनवीन लेखक, दिग्दर्शक, कलाकार आणि तंत्रज्ञ मंडळीची रंगभूमीवर एन्ट्री होत असते सन २०१६ यावर्षी एकांकिका विश्वात मात्र एक आगळावेगळा प्रयोग केला गेला महाराष्ट्राच्या विविध प्रांतात खेडोपाडी संवादाचे माध्यम असलेल्या ''बोलीभाषा'' हा या प्रयोगाचा केंद्रबिंदू होता आणि त्यातून थेट ''बोलीभाषा ''एकांकिका स्पर्धेची मुहूर्तमेढ रोवली गेली. या सगळ्या प्रयोगाची उत्पत्ती मात्र एका वेगळ्याच घटनेमुळे झाली आहे ◀◀ पान २ वर

उमेद प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिवशीही लाखोंची उलाढाल

बीड । पतिनिधी

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद बीड द्वारा आयोजित बीड जिल्हास्तरीय सरस विक्री व प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिवशी नागरिक व महिलांच्या प्रचंड प्रतिसादामुळे उमेद गटातील महिलांनी बनवलेल्या विविध मसाले, पापड, कुरडया, शेवया ,शोभेच्या वस्तू, पर्स, चप्पल, विविध गृहपयोगी वस्तू व खाद्यपदार्थांची आज अखेर

८.५० लाख रुपयाची विक्री झाली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड श्री आदित्य जीवने व प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बीड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या यावेळी सरस प्रदर्शनात विविध वस्तूंचे व खाद्यपदार्थांचे ११६ स्टॉल लावण्यात आलेले असून ग्रामीण भागातील उमेद गटांच्या महिलांनी बनवलेल्या स्वादिष्ट , रुचकर, अस्सल ग्रामीण शाकाहारी, मांसाहारी पदार्थ तसेच नाश्ता फराळाचे पदार्थांना मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे. या सर्व स्टॉलला मिळत असलेल्या प्रचंड प्रतिसादामुळे दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी पाच लाख ८० हजाराची विक्री झाली आहे. तसेच सायंकाळी उमेद कर्मचारी, शासकीय ◀◀ पान २ वर

तेलगाव : येथे कर्मवीर एकनाथराव आव्हाड यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना मानवी हक्क तालुका अध्यक्ष विष्णू मुजमुले, ग्रा.पं सदस्य रुग्णसेवक शरद झोडगे, ग्रा.पं. सदस्य बंडू मुजमुले, डॉ.प्रा.पप्पू मुजमुले, अजय जाधव, स्वप्निल झोडगे उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे झ्युरिचमध्ये उत्स्फूर्त स्वागत

दावोस । वृतसंस्था

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये उपस्थित राहण्यासाठी आज झ्युरिच, स्वित्झर्लंड येथे आगमन झाले. हिंदू स्वयंसेवक संघ आणि सेवा स्वित्झर्लंड संस्थेच्या वतीने त्यांचे आनंदाने स्वागत करण्यात आले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा अभिमान व्यक्त करत, स्थानिक मराठी मंडळींनी पारंपरिक पद्धतीने लेझीम खेळत त्यांचे स्वागत केले.

याप्रसंगी, झ्युरिचमधील लहान मुलांनी मराठी गौरवगीत सादर करत 'पुन्हा येण्या'ची भावना अधोरेखित केली. वेदांत, हृषिकेश, रश्मी आणि अद्विका या चिमुकल्या दोस्तांनी आपल्या निरागस ◀◀ पान २ वर

दोन दिवसीय खुल्या बुद्धिबळ स्पर्धा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी व योगेश्वरी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पू. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या ५३ व्या पुण्यतिथी निमित्ताने २० ,२१ जानेवारी रोजी योगेश्वरी महाविद्यालयाच्या नागापुरकर सभागृहात शालेय खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्रबोधिनीच्या वतीने देण्यात आली या स्पर्धेत १४ वर्षाखालील मुले,मुली १७ वर्षाखालील मुले,मुली यांना भाग घेता येईल या स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम पारितोषिक रुपये एक हजार एक, द्वितीय पारितोषिक रुपये सातशे एक, आणि तृतीय पारितोषिक पाचशे एक असे ठेवण्यात आले आहेत प्रवेश नोंदणीसाठी तसेच स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी प्रा. सारिका जगताप-मो. नं.९९२३०८७६१६ प्रा.प्रवीण भोसले-मो.नं.९५१८७२५२१९ व खुशाल परदेशी-मो.नं.९७६३५८०४०४ यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

शिक्षक मैत्री प्रतिष्ठाणच्या वतीने आयोजित सामान्य ज्ञान परीक्षेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

सलग तिसऱ्या वर्षी ८०० विद्यार्थ्यांनी दिली एमपीएससीच्या धर्तीवर सामान्य ज्ञान परीक्षा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांसाठी शिक्षक मैत्री प्रतिष्ठाणच्या वतीने सलग तिसऱ्या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेस विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला. या परीक्षेत ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. जवळपास ८०० विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. स्वामी विवेकानंद , राष्ट्रमाता जिजाऊ आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त ही सामान्य ज्ञान परीक्षा शिक्षक मैत्री प्रतिष्ठाण अंबाजोगाईच्या वतीने

संकल्प विद्या मंदिर येथे आयोजित करण्यात आली होती. प्रतिष्ठाण च्या वतीने आयोजित सामान्य ज्ञान परीक्षेचे हे तिसरे वर्ष होते.

ही स्पर्धा आयोजीत करण्यामागची संकल्पना शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार यांनी मांडली. ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये लेखन व वाचनाची आवड व गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने ही परीक्षा घेण्यात आल्याचे रापतवार यांनी नमूद केले. सदरील परीक्षा ही ५० गुणांची ५० वस्तुनिष्ठ प्रश्नांसाह प्रत्येकी एक गुण अशा स्वरूपाची होती. प्रत्येक वर्षी मुलांची संख्या वाढत असल्याने या स्पर्धेस मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे यावरून दिसून येत आहे. या स्पर्धा परीक्षेसाठी प्रमुख पाहुणे श्री योगेश्वरी दर्शन न्युज चॅनल चे संपादक नागेश औताडे हे उपस्थित होते. त्यांनी देखील उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. प्रत्येक विद्यार्थी हे एकमेकांत स्पर्धा निर्माण करतात व त्यातून पुढे जाण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे औताडे यांनी याप्रसंगी स्पष्ट केले. उपस्थित सहभागी विद्यार्थ्यांना ज्या शिक्षक मैत्री प्रतिष्ठानने ही सामान्य ज्ञान परीक्षा आयोजित केली आहे त्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष कोण आहेत या प्रश्नापासूनच या स्पर्धेची सुरुवात केली व या प्रश्नाचे उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. यावरून आजची पिढी ही किती सजग व जागृत आहे याचा अनुभव करून दिला. या स्पर्धेसाठी गट शिक्षण अधिकारी कार्यालयातील जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर सुवर्णकार यांनी देखील विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत प्रतिष्ठाण राबवित असलेल्या या विधायक उपक्रमाचे देखील कौतुक केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप संकल्प विद्या मंदिराच्या मुख्याध्यापिका श्रीमती रेखा बडे यांनी केला. शिक्षक मैत्री प्रतिष्ठान हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या युगाची ओळख करवून देत आहे. त्याचबरोबर त्यांना स्पर्धेत उतरण्यासाठी त्याचबरोबर स्पर्धेत टिकण्यासाठीची जिद्द निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन देत असल्याबद्दल प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार तसेच त्यांच्या संपूर्ण सहकाऱ्यांचे अभिनंदन व कौतुक केले. मागील दोन वर्षांपासून संकल्प विद्या मंदिर येथे शिक्षक मैत्री प्रतिष्ठान हे सामान्य ज्ञान ही परीक्षा आयोजित करत आहे. या विद्यालयाकडून स्पर्धेसाठी सर्वोतोपरी सहकार्य केल्या ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

पुण्यातील अवैध पिस्तुलांचे मध्यप्रदेशात कनेक्शन

पुणे पोलिसांकडून ९ आरोपींसह ७ पिस्टल जप्त

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात कोयत्याने दहशत माजावणाऱ्या घटनांमध्ये वाढ होत असतानाच आता पुण्यातील विविध ठिकाणाहून पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने ७ पिस्तूल जप्त केले आहेत. या सर्व ७ पिस्तूल आणि त्यासोबत असलेले जिवंत काडतुसे वापरणाऱ्या ९ जणांना पोलिसांनी अटक केली आहे. या ९ जणांचे पिस्तूल बाळगण्यासाठीचे अनेक कारणे समोर आली आहेत. काही जणांनी जमिनीच्या वादातून स्वतःचे रक्षण करण्यासाठी पिस्तूल विकत घेतले आहेत, तर काही जणांनी वर्चस्व राहावं यासाठी या पिस्तूल खरेदी केल्याचं तपासातून निष्पन्न झालं आहे. विशेष म्हणजे हे सर्व पिस्तूल मध्य प्रदेशमधून अगदी कमी किंमतीत आणले जात असून पुढे याची विक्री लाखो रुपयांमध्ये होते हे सुद्धा समोर आले आहे.

> **“ शरद मोहोळच्या खुनाचा बदला, मध्य प्रदेशातून आणले पिस्तूल**
>
> वर्षभरापुर्वी कोथरूड परिसरात सुतारदरा येथे कुख्यात गुन्हेगार शरद मोहोळ याचा खून झाला होता. त्याचे प्रत्युत्तर देऊन बदला घेण्यासाठी कडू आणि मालपोटे यांनी मध्य प्रदेशातून दोन पिस्तूल आणली होती. मात्र, या दोघांना पोलिसांनी पकडले. संदेश लहू कडू (वय २४, रा. काळुबाई कॉलनी, कोथरूड) आणि शरद शिवाजी मालपोटे (वय २९, रा. सुतारदरा) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

या प्रकरणात सागर ढेबे या तरुणासह इतर ८ जणांना पोलिसांनी अटक केली आहे. सागर ढेबेवर याआधी पुण्यातील अनेक पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. पकडलेल्या ७ पिस्तूलची किंमत जरी २ लाख ८६ हजार असेल तर ती मुख्य आरोपीने इतरांना कितीला विकली याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. या निमित्ताने पुण्यात गुन्हेगारांच्या हाती पिस्तूल येण्याचे मध्य प्रदेश कनेक्शन सुद्धा समोर आले आहे. काही दिवसांपूर्वी शरद मोहोळ याच्या हत्येच्या बदला आणि कोथरूडमध्ये वर्चस्व राहावे यासाठी तरुणांनी जे पिस्तूल आणले होते ते सुद्धा मध्य प्रदेश मधूनच आणले होते.

बसमध्ये बोलण्यात गुंतवून तिन महिलांनी लाखोंचे दागिने अन् रोकड लांबवली

पुणे । प्रतिनिधी

गावाकडे जमिनीचे खरेदीखत असल्याच्या कारणास्तव मुंबई ते खंडाळा असा बसने प्रवास करत गावी निघालेल्या महिलेला बोलण्यात गुंतवले. त्यानंतर तिच्याकडे असलेली रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा तब्बल १३ लाख ४५ हजार रुपयांचा ऐवज तीन महिलांनी लंपास केला. या प्रकरणात राजगड पोलीस ठाण्यात तीन महिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यातील संशयित एका महिलेला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मालन गायकवाड या खरेदी खतासाठी लागणारे पैसे देण्याकरिता गावी खंडाळा येथे निघाल्या होत्या. मुंबई-कराड बसने त्या जात होत्या. यावेळी त्यांच्याकडे रोख रक्कम आणि दागिने असलेली बॅग होती. त्यामध्ये मंगळसूत्र, राणीहार, नेकलेस, लक्ष्मीहार, अंगठी इत्यादी दागिने तसेच ६ लाख १० हजार रुपये रोख रक्कम होती. प्रवास करताना ही बस लोणावळा वाकड मार्गे नवले ब्रिज येथे आली. त्याठिकाणी बसमध्ये तीन महिला बसल्या. त्यातील एका महिलेकडे लहान मुल होते. या सर्व महिला मालन यांच्याजवळ बसल्या होत्या. बस नसरापूरजवळ आल्यावर एका महिलेने तुमच्या सिट खाली पैसे पडले आहेत, असे मालन गायकवाड यांना सांगितले. यानंतर या सर्व महिला त्यांच्यापाशी घोळका करत पैसे गोळा करण्यासाठी खाली वाकू लागल्या. तितक्यात एका महिलेने त्यांच्या जवळील पैसे आणि दागिन्यांची बॅग काढून घेतली. यानंतर लगेचच त्या महिला आम्हाला येथे उतरायचे आहे गाडी थांबवा असे म्हणू लागल्या. कंडक्टरने गाडी येथे थांबणार नाही, असे सांगितले असता त्यांनी गोंधळ घालायला सुरुवात केली. यामुळे कंडक्टरने कापरहोळ (ता. भोर) जवळ बस थांबवून त्यांना उतरू दिले. त्यानंतर मालन गायकवाड यांना आपल्या जवळ दागिने आणि रोख रक्कम असलेली बॅग आढळून आली नाही. त्यामुळे त्या तीन महिलांनी पैसे गोळा करण्याच्या बहाण्याने बॅग चोरल्याचे त्यांना लक्षात आले. त्यांनी त्यांचे पती विलास गायकवाड यांना हा प्रकार फोनवर सांगितला. त्यानंतर बस चांदणी चौकात आली असता योगायोगाने त्या तिघी महिला बसमध्ये चढल्या. त्यातील एका महिलेने मालन गायकवाड यांना बसमध्ये बसलेले पाहिले असता त्या पुन्हा बसमधून उतरू लागल्या. मालन यांनी त्या महिलेला ओळखले. त्यांनी लगेच आरडा ओरडा करत ''हीच ती महिला आहे जिने माझी पैशाची व दागिने असलेली पिशवी चोरली आहे'', असे सांगितले. यांनतर उपस्थितांनी प्रसंगावधान दाखवत त्यातील एका महिलेला पकडले. यावेळी तिच्या सोबतच्या इतर दोन महिला पळून जाण्यास यशस्वी ठरल्या. शैलजा राजू भोगे (वय ३८ वर्ष, रा. औरंगाबाद, चिखलठाणा) असे पकडलेल्या महिलेचे नाव असून बावधन पोलिसांनी तिला राजगड पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

राष्ट्रीय तालीमच्यावतीने शहर निवड चाचणी कुस्ती स्पर्धेचे आयोजन

पुणे । प्रतिनिधी

६७ व्या राज्य अजिंक्यपद गादी व माती गट कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताब कुस्ती स्पर्धेसाठी राष्ट्रीय तालीम संघाच्या वतीने शहर निवड चाचणी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती राष्ट्रीय तालीम संघाचे सरचिटणीस शिवाजीराव बुचडे यांनी दिली.

राष्ट्रीय तालीम संघाची निवड चाचणी कुस्ती स्पर्धा शनिवार दि.२५ जानेवारी रोजी मंगळवार पेठ येथील छत्रपती शिवाजी स्टेडियम येथे सकाळी ९ ते ११ यावेळेत कुस्तीगीरांची वजने होतील आणि सांय ४ वाजता कुस्ती स्पर्धस प्रारंभ होईल. तरी पुणे शहरातील सर्व पैलवान, वस्ताद, कुस्ती शौकीन यांनी उपस्थित राहावे. गादी आणि माती गटात ५७ कि., ६१ कि., ६५ कि., ७० कि., ७४ कि., ७९ कि., ८६ कि., ९३ कि., ९७ कि. आणि ८६ ते १२५ की महाराष्ट्र केसरी गटासाठी वजनगट असणार आहे. या कुस्ती निवड चाचणीमध्ये कुस्तीगीर ज्या शहर किंवा जिल्हा संघातून सहभागी होणार आहे. तेथील रहिवासी असणे बंधनकारक आहे, कुस्तीगीरांची जन्म तारीख २००४ व त्या पुर्वीची असावी तसेच सन २००५ व २००६ मध्ये जन्मलेल्या कुस्तीगीरास मेडिकल सर्टिफिकेट व पालकांचे संमतीपत्र असेल तर सहभागी होता येणार आहे. वयाचा व रहिवासी पुरावा म्हणून ओरिजनल आधार कार्ड अथवा पासपोर्ट ग्राह्य धरण्यात येईल, रेल्वे व आर्मी (सर्व्हिसेस) मध्ये नोकरीस असलेल्या कुस्तीगीरास या स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार नाही. ग्रिकोरोमण राज्य अजिंक्यपद स्पर्धेतील पदक विजेत्या कुस्तीगीरास या स्पर्धेमध्ये सहभाग घेता येणार नाही. स्पर्धेसाठी १ किलो सुट देण्यात येणार असून स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी ज्ञानेश्वर मांगडे आणि रोहिदास आमले यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन शिवाजीराव बुचडे यांनी केले आहे.

सायबर फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश, ३ संशयित पोलिसांच्या जाळ्यात

पुणे । प्रतिनिधी

पुणे पोलिसांनी सायबर फ्रॉड करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीचा पर्दाफाश केला आहे. नेपाळच्या २ आरोपींसह तामिळनाडूमधील १ अशा एकूण ३ आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. पोलिसांनी केलेल्या तपासात ही टोळी आंतरराष्ट्रीय सायबर गुन्हेगारांसाठी काम करत असल्याचं निष्पन्न झालंय. या टोळीने ६८ लाखांच्या गैरव्यवहारांसह ५० अकाउंट वरून १३ कोटी रुपयांची उलाढाल केल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणी कोथरूड पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी तपासाला सुरूवात केली. पोलीस तपासात एकूण ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. लाचीन शेर्पा (नेपाळ),बिन बहादूर प्रधान (नेपाळ), तर रमेश कुमार अभिमन्यू (तमिळनाडू) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून ७ मोबाईल,अनेक बँकांचे पासबुक, चेकबुक, यासह बनावट पासपोर्ट देखिल पुणे पोलिसांकडून जप्त करण्यात आले आहेत. याआधी या आरोपींनी मुंबई पुण्यासह बेंगलोरमध्येही अनेकांची फसवणूक केल्याचे पोलीस तपासातून निष्पन्न झाले आहे.

नारायणगाव अपघातातील ट्रक, एसटी चालक अटकेत

नारायणगाव । प्रतिनिधी

पुणे-नाशिक महामार्गावरील नारायणगाव येथे शुक्रवारी (दि.१८) सकाळी झालेल्या अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी आयशर मालट्रकचालक रोहित कुमार जगमालसिंग चौधरी (वय ३०) व नाशिक-महाबळेश्वर या एसटीचे बसचालक भाऊसाहेब भास्कर जायभाई (वय ४०) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना अटक करण्यात आली आहे.

या दोघांना शनिवारी (दि.१९) जुन्नर न्यायालयात हजर केले असता मालट्रकचालक रोहित कुमार जगमालसिंग याला तीन दिवसांची पोलिस कोठडी, तर एसटी बसचालक भाऊसाहेब जायभाई याला न्यायालयीन कोठडी दिली असून, त्यांची रवानगी येरवडा कारागृहात करण्यात आली आहे. दरम्यान, अपघातातील दोन गंभीर जखमीची प्रकृती चिंताजनक असून, इतर जखमींच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे, अशी माहिती सहायक पोलिस निरीक्षक शेलार यांनी दिली. पुणे-नाशिक महामार्गावर येथील मुक्ताई ढाब्याजवळ प्रवासी वाहतूक करणारी मॅक्झिमो व्हॅन, मालवाहतूक आयशर टेम्पो व एसटी बस या तीन वाहनांमध्ये शुक्रवारी सकाळी भीषण अपघात झाला होता. या अपघातात मॅक्झिमो व्हॅनच्या चालकासह नऊ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. आठ प्रवासी जखमी झाले होते. यापैकी तस्लीम वसीम इनामदार (वय ३०) आणि गणपत बजाबा घाडगे (वय ५२) यांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यांच्यावर नारायणगाव येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पुण्यामध्ये पुनश्च एकवार नॅशनल गेम्सचे आयोजन होण्यासाठी प्रयत्न करणार – खा.मुरलीधर मोहोळ

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्रात आणि पुण्यामध्ये पुनश्च एकवार नॅशनल गेम्सचे आयोजन व्हायला हवे आणि त्यासाठी आपण प्रयत्न करूया असे प्रतिपादन केंद्रीय राज्यमंत्री नामदार मुरलीधर मोहोळ यांनी केले. बालेवाडी येथील छत्रपती क्रीडा संकुल येथे आयोजित सब ज्युनिअर राष्ट्रीय स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, ज्यूदो हा खेळ माझ्या आवडत्या कुस्ती खेळाशी खूप साम्य असून यातील डावही कुस्तीमध्ये वापरले जातात त्यामुळे ज्यूदो आणि कुस्ती हे युद्धकलेचे खेळ, भाऊभाऊच आहेत. स्पर्धेचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. प्रसिद्ध उद्योजक पुनीत बालन यांची या कार्यक्रमास विशेष उपस्थिती होती. यावेळी पुनीत बालन यांनी स्पर्धेतील सहभागी पदक विजेत्यांसाठी रोख दहा लाख रुपयांची बक्षिसांची घोषणा केली, यामध्ये सुवर्णपदक विजेत्यास ११,००० रुपये, रोप्य पदक विजेत्यास ७००० रुपये तर दोन्ही कांस्यपदक विजेत्यास पाच हजार प्रत्येकी असे बक्षीस जाहीर केले. यावेळी व्यासपीठावर इन्स्पायर इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्सचे तथागत मुखर्जी आणि ज्यूदो फेडरेशनचे पदाधिकारी वीरेंद्र वशिष्ठ, सी एस राजन यांसह द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त जीवन शर्मा, अर्जुन पुरस्कार प्राप्त यशपाल सोलंकी, राज्य ज्यूदो संघटनेचे अध्यक्ष धनंजय भोसले यांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते. समारंभास पॅरिस येथील ऑलिम्पिक स्पर्धेत रौप्य पदक विजेता अर्जुन पुरस्कार प्राप्त सचिन खिलारे यांना विशेष आमंत्रित केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य ज्यूदो संघटनेचे महासचिव शैलेश टिळक यांनी तर आभार प्रदर्शन तांत्रिक सचिव दत्ता आफळे यांनी केले. स्पर्धेसाठी सबज्युनियर गटामध्ये २९ राज्यातील २३५ मुले आणि २३० मुली खेळाडू सहभागी झाले आहेत.

रुग्णांच्या जीवाशी करत होते खेळ; पुण्यातील महिला डेंटीस्टसह २ जनांवर गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

डायगॉस्टीक सेंटरमधील एक्सरे व इतर मशिन हाताळण्याचा कोणताही अनुभव नसताना ते हाताळून रुग्णांच्या जीवाशी खेळ केल्याप्रकरणी एका महिला डेंटीस्टसह तीची सहकारी महिला डॉक्टर आणि कर्मचारी अशा तीघांवर विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे यासंदर्भात तक्रार खुद्द महिला डॉक्टरच्या पतीनेच दिली आहे.

याप्रकरणी स्वप्निल देवरुखकर (३२,रा. विश्रांतवाडी) याच्यासह दोन महिला डॉक्टरांविरुध्द भारतीय दंड संहितेच्या १२५, ३५१(२), ३२४(२), ३(५) कलमानूसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी डॉ. अमित कस्तुरीलाल लुथरा यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, त्यांचे विमाननगर येथे लाईफबेरीज हेल्थ केअर नावाचे डायग्नोस्टीक सेंटर आहे. तेथे येणाऱ्या रुग्णांच्या तपासणीकरीता त्यांच्याकडे ब्रीव्हो एक्सआर, एक्ट्रॉनिक्स इमॅजिक सिस्टीम आणि केअर थ्री व्हिटा सी.आर सिस्टम आदी मशिन्स आहेत. हे मशिन चालविण्याचे त्यांनी प्रशिक्षण घेतले असून त्याचा परवाना त्यांना भारत सरकारच्या परमानु उर्जा नियामक मंडळाकडून मिळालेला आहे. ते २ डिसेंबर रोजी सेंटरमध्ये गेले असता, त्यांना त्यांची डॉक्टर पत्नी , तीची सहकारी डॉक्टर आणि कर्मचारी देवरुखकर हे एक्स रे काढत असताना दिसून आले. त्यांना मशिन चालविण्याचे प्रशिक्षण नसताना मशिन का हाताळले अशी विचारणा करण्यात आली.

मात्र ते काहीही न बोलता निघुन गेले. त्यांनी स्टिमची पहाणी केली असता, त्याला पासवर्ड टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले. परवाना आणि प्रशिक्षण नसताना देखील त्यांनी क्लिनिकमधील रुग्णांचा एक्सरे काढून रुग्णांच्या जिवाला धोका निर्माण केला आहे. याप्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय संकेश्वरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

गाडी बुकींगच्या नावाखाली दीड लाखांची फसवणूक

पिंपरी । प्रतिनिधी

दुचाकी बुकींग करण्यासाठी एक लाख ४२ हजार रुपये घेतले. मात्र ती दुचाकी अन्य व्यक्तीला देऊन फसवणूक केली. ही घटना चर्होली येथे ३ ऑक्टोबर २०२४ रोजी घडली.

आनंद श्रीधर शिंदे (वय ३२, रा. शितळादेवी मंदिरा शेजारी, बोपखेल) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. सध्या त्याला आळंदी पोलिसांनी दुसर्या गुन्ह्यात अटक केली आहे. रवींद्र उत्तमनाथ नाथजोगी (वय ३३, रा. डुडुळगाव) यांनी शुक्रवारी (दि. १८) दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांनी आपल्या पत्नीसाठी परीणीती या शोरूममधून दुचाकी बुक केली. त्यासाठी फायनान्सचे कागदपत्र तयार करीत त्यावर फिर्यादी यांच्या स्वाक्षरी घेतल्या. मात्र फिर्यादी यांच्या नावे असलेल्या गाडीचा ताबा न देता ती गाडी परस्पर अन्य व्यक्तीला देऊन फिर्यादी यांची एक लाख ४२ हजारांची फसवणूक केली. दिघी पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

सावकारांच्या जाचाला कंटाळून अख्या कुटुंबाने उचलं टोकाचं पाऊल

पिंपरी । प्रतिनिधी

सावकारांच्या जाचाला कंटाळून एका कुटुंबाने झोपेच्या गोळ्या खाऊन गळफास घेत सामूहिक आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना पिंपरी-चिंचवड शहरातील चिखली येथे उघडकीस आली. यात पत्नी आणि मुलाचा मृत्यू झाला. दरम्यान, पोलिसांच्या तत्परतेमुळे पतीचे प्राण वाचले असून, याप्रकरणी चार जणांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

शुभांगी हांडे (३६) आणि धनराज

दोघांचा मृत्यू, एकास वाचविण्यात यश

हांडे (९) अशी मृतांची नावे असून, वैभव हांडे (४५) हे गंभीर जखमी झाले. हे कुटुंब चिखलीतील सोनवणेवस्ती येथे वास्तव्यास होते. याप्रकरणी वैभव हांडे यांनी चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार, पोलिसांनी संतोष कदम (४७), सुरेखा कदम (३५), संतोष पवार (४०) आणि जावेद खान (३२) या चौघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी वैभव हांडे यांनी आरोपी संतोष कदमकडून सहा लाख रुपये दरमहा १० टक्के व्याजाने घेतले होते. महिला आरोपीकडून दोन लाख रुपये, संतोष पवारकडून साडेसात लाख रुपये आणि जावेद खानकडून चार लाख रुपये कर्ज घेतले होते. कर्जाची बहुतांश रक्कम परतफेड करूनही आरोपींनी तगादा लावला होता. महिला आरोपीकडून घेतलेल्या दोन लाखांच्या बदल्यात हांडेंनी २० गुंठे जमीन लिहून दिली होती. तरीही १४ लाख रुपये दिल्याशिवाय जमीन परत देणार नाही, असा अट्टहास ती करत होती. संतोष कदमला ९ लाख ५० हजार रुपये, एक एकर जमीन आणि महिला आरोपीला दरमहा २० हजार रुपये दिल्यानंतरही त्यांचा तगादा थांबला नाही. आरोपींनी वैभव हांडे आणि त्यांच्या कुटुंबीयांना शिवीगाळ, धमक्या आणि मारहाण करून मानसिक त्रास दिला. आरोपी जावेद खान याला चार लाख ५० हजार रुपये व्याज स्वरूपात दिले गेले होते, तर संतोष पवारला साडेसात लाख रुपये देऊनही त्यांचा तगादा कायम होता. या मानसिक त्रासाला कंटाळून हांडेंनी आत्महत्येचा निर्णय घेतल्याचे फिर्यादीत नमूद आहे. घटनेपूर्वी हांडेंनी मेडिकलमधून झोपेच्या गोळ्या घेतल्या होत्या. त्या खाऊन घरातील छताच्या पंख्याला गळफास घेतला. या घटनेत पत्नी शुभांगी आणि मुलगा धनराज यांचा मृत्यू झाला; मात्र पोलिसांच्या तत्परतेमुळे वैभव हांडे यांचे प्राण वाचले. या प्रकरणी चिखली पोलिस तपास करत आहेत.